दाखविलें व ते ह्मणालेः— “ रामदीन, तुझ्या जिवावर बेतेल, असें मी कधीं करणार नाहीं. हें पाहिलेंस, ही सुंदरी नसून दुसऱ्याचेंच प्रेत आहे. आह्मी तेथें असतां हा आल्यामुळें आह्मी येथें येत असल्याबद्दल हा बाहेर कळवील व तुमच्या जिवावर व्यर्थ घाला येईल, ह्मणून यास मारावेंच लागलें.

दासी०— रामदीन, आपल्याला छळणाऱ्या त्या हरिसिंहाचेंच हें प्रेत !!

राम०—तर मग त्याला मारलें, ही गोष्ट फारच चांगली झाली; पण याला कोणाला न सांपडेल, अशा ठिकाणीं पुरून टाका बरें कां?

बाबू०— त्याबद्दल तुह्मी अगदीं बेफिकीर असा. मी सर्व बंदोबस्त करितों.

असें बोलून बाबूसाहेब दासीसह निघाले व पूर्वीच्याच वाटेनें किल्याच्या बाहेर येऊन सूखरूप पोंचले. यावेळीं पाऊस अगदीं बंद होऊन क्वचित् नक्षत्रेंही दिसूं लागलीं होतीं. बाबूसाहेबांनीं शिवालयाचा रस्ता सोडून रानाचा रस्ता धरिला. बरेंच लांब गेल्यावर त्यांस हातांत मोठमोठे सुरे घेतलेले दोन इसम भेटले, व ते त्यांस दरडावून ह्मणालेः— “ हां, खबरदार एक पाऊल पुढें टाकलेंस तर. तें गाठोडें कसलें आहे, तें आमच्यापुढें ठेव. खचित् त्यांत मेतबीत कांहीं तरी असलें पाहिजे. ”

बाबू०— होय. निःसंशय यांत प्रेत आहे व तें या नगरांतील सर्व प्रजेस छळणाऱ्याचें प्रेत आहे. हा मेल्याचें ऐकून येथील कोणास वाईट वाटेल असा एकही मनुष्य तुह्मांला आढळणार नाहीं, हें तुह्मांस खास सांगतों.

एकम०— त्यामुळें आह्मांलासुद्धां आनंद होईल किंवा झाला आहे, हें तुला कसें समजणार ?

बाबू०—तुह्मी राजाच्या पक्षाचे नसावेत, असें मला वाटलें ह्मणून!!

दुसरा म०— तें कांहीं असो. पण, हें प्रेत कोणाचें आहे व तुझें नांव काय, हें आह्मांला समजलेंच पाहिजे.

बाबू०— (प्रेत खालीं ठेवून) हें हरिसिंहाचें प्रेत आहे. हें मी तुह्मांला सांगतों; पण, तुमचें नांव कळल्याशिवाय मी मात्र आपलें नांव तुह्मांस सांगणार नाहीं.

पहिला म०— हें प्रेत हरिसिंहाचें आहे, हें ऐकून मला आनंद झाला आहे व तूं आमच्या पक्षाचा आहेस, असें समजून माझें नांव नाहरसिंह आहे, हें मी तुला स्पष्ट सांगतों. आतां तूं आमच्या पक्षाचा नसून विरुद्ध पक्षाचा असलास तरी चालेल. मी तुला भीत नाहीं.

बाबू०— आपलें नांव नाहरसिंह आहे, हें ऐकून मलाही फार आनंद झाला. आपली भेट व्हावी, अशी मी फार दिवस इच्छा करीत होतों; परंतु, आपलें राहण्याचें ठिकाण मला नक्की माहीत नसले-मुळें तो योग घडून आला नाहीं. यावेळेस वीरसिंहाचीही गांठ पडती तर किती उत्तम झालें असतें !!

दुसरा०— वीरसिंहाची भेट घेऊन तुला काय करावयाचें आहे ?

बाबू०— त्याला भेटून असें सांगावयाचें आहे कीं, राजा तुझा दुष्मन् आहे, तरी सावध रहा. व जिच्यासंबंधानें त्याला अद्याप माहितीही नाहीं, त्या त्याच्या बहिणीचीही कांहीं हवाल सांगाव-याची आहे. शिवाय, त्याची स्त्री तारा ही अद्याप जिवंत आहे. तथापि, तिला अद्याप मरणाची भीति ही आहेच, असेंही त्याला सांगावयाचें आहे. (नाहरसिंहाकडे पाहून) तुह्मी त्यास आजच कैदेंतून सोड-विलें, अशी बातमी मला कळली आहे. आपण कृपा केली तर माझी व वीरसिंहाची गांठ पडेल.

नाहर०— अहाहा !! आतां माझ्या लक्षांत आलें कीं, आपलें नांव बाबूसाहेब आहे. आपलें खरें नांव कदाचित् दुसरें असेल; पण आपणाला बाबूसाहेब ह्मणतात, हें खरेंना !!

बाबू०— होय. गोष्ट खरी आहे.

नाहर०— मीं पुष्कळ प्रयत्न केला, पण आपली पूर्ण माहिती आह्मास मिळाली नाहीं. असो. आतां आह्मी तुह्मास स्पष्ट सांगतों कीं, माझें नांव नाहरसिंह नसून आह्मी दोघे त्याचे नौकर आहों. त्यांनीं आज वीरसिंहाला सोडवून नेलें ही गोष्ट खरी आहे. आपली इच्छा असेल तर नाहरसिंह व वीरसिंह यांची तुमची भेट होईल.

बाबू०— त्यांची गांठ घेण्याची तर मला फारच उत्कंठा आहे.

पहिला म०— पण, हें तुमच्याबरोबर मूल घेऊन कोण आलें आहे ?

बाबू०— ती सर्व हकीकत तुह्मांस नाहरसिंहाचे समोरच समजेल.

पहिला म०— तर काय तुह्मी त्यांजकडे चलण्यास आतां तयार आहां ?

बाबू०— होय, अलबत्.

पहिला म०— बरें तर. तें गाठोडें मजजवळ द्या. मी त्या प्रेताची वाट लावून, फक्त शीर मात्र मालकास दाखविण्यास बरोबर घेतों. तुह्मी तें मूल आपलेजवळ घ्या व त्या स्त्रीस परत जाऊं द्या.

बाबूसाहेबांनीं मुलास घेऊन त्या दासीस परत पाठविलें. एकानें बाबूसाहेबांजवळून तें प्रेताचें गाठोडें आपल्या पाठीवर घेतलें व ते तिघेजण निघाले. ते फार दूर गेले नाहींत तोंच मागून घोड्यांच्या टापांचे आवाज त्यांच्या कांनीं पडले. त्याबरोबर बाबूसाहेब ह्मणालेः— "खचित् आपणांस धरण्यास हे स्वार येत असावेत."

प्रकरण ९ वें.

मध्यरात्रीचा समय. चोहींकडे अंधार पडला आहे. आकाशांत कोठें कोठें काळे ढग असल्यामुळें नक्षत्रप्रकाशही स्पष्ट दिसत नव्हता. मधून मधून पावसाचे तुषारही पडत होते. हरिपूर शहरांत जिकडे तिकडे काळोख किट्ट असून मनुष्यांचा राबता अगदीं बंद झाला होता. अशा वेळीं काळ्या पोषाखानें आपलें शरीर झांकून टाकलेले दोन भव्य पुरुष हरिपूर शहरांतून मोठ्या झपाट्यानें चालले होते. हमरस्ता टाकून बहुतेक हे आडरस्त्यांतूनच चालले होते. इच्छित ठिकाणीं लवकर पोंचण्याकरितां ते मोठ्या घाईनें चालत होते; परंतु, गर्द अंधारामुळें जलद चालण्याची त्यांना वारंवार पंचाईत पडत होती; तथापि, मधून मधून चमकणाऱ्या विद्युत्प्रकाशांतून ते आपल्याकडून होईल तितकी जलदी करीतच होते. अशा तऱ्हेनें कांहीं वेळ आडवीं तिडवीं वळणें घेत गेल्यावर ते एका मोठ्या वाड्यापाशीं पोंचले. त्या वाड्याचे दरवाजावर नागव्या तरवारी घेतलेले १०।१५ शिपाई पहारा करीत होते. या दोघांनीं आपलें तोंड स्पष्ट न दिसेल, अशा तऱ्हेनें आपल्यास झांकून घेऊन एकजण पुढें सरला व ‘ जय महादेव ’ ह्मणून ओरडला. त्याबरोबर ते शिपाईही ‘ जय महादेव ’ ह्मणून ओरडले. व त्या शिपायांचा नाईक पुढें सरून ह्मणालाः— “ आज हें दुसरे कोणास बरोबर आणले आहे ? यांसुद्धां तुह्मी आंत नेणार कीं काय ? ”

मनुष्य०— नाहीं. तूर्त मी एकटाच आंत जातों व हा बाहेर येथेंच बसेल. सरदारसाहेबांनीं जर यास आंत बोलाविलें, तरच हा आंत येईल.

शिपाई०— हो, असेंच होणें चांगलें. आपण जावें.

त्या दोघांतून एकजण बाहेर बसला. या बाहेरच्या मनुष्यास करमेना, ह्मणून तो इकडे तिकडे तेथेंच हिंडत राहिला व दुसरा मनुष्य वाड्यांत शिरला व तीन दरवाजे ओलांडून तो एका दिवाणखान्यांत जाऊन पोंचला. त्या दिवाणखान्यांत सुमारें २० इसम आपसांत कांहीं विचार करीत बसले होते. मध्यें दोन शामदानें जळत होतीं. ते सर्व लोक सशक्त, धाडसी व दृढनिश्चयी दिसत होते. सर्वांचेपुढें एकेक तरवार होती. त्या सर्वांमध्यें एक तरूण ज्वान श्रीमंती थाटाचा पोषाख करून उंची म्यानाची तरवार घेऊन बसला होता. त्याच्या ऐटीवरून तो कोणी तरी बहाद्दर शिपाईगडी असावा, असें स्पष्ट दिसत असून त्याच्या पोषाखावरून तो नेपाळाकडील असावा असेंही वाटत होतें व खरोखरच तो नेपाळी असून नेपाळचे राजाचा सेनापति होता. चार हुजरे त्या सर्वांना पंख्यानें वारा घालीत होते.

या नवख्या मनुष्यानें तेथें जाऊन पोंचल्यावर, आपले तोंडावरील बुर्खा काढिला व सर्वांस सलाम करून तो ह्मणालाः— "आमचें अर्थात् हरिपूरच्या प्रजेचें दुःख दूर करण्याकरितां नेपाळच्या महाराजांनीं आपला एक सरदार मुद्दाम येथें पाठविला, याबद्दल नेपाळच्या महाराजांचे आह्मी अत्यंत ऋणी झालों आहों; व येथील मोठमोठ्या घरंदाज, वीर व धर्मात्म्या लोकांमध्यें ते सरदारसाहेब हजर आहेत, हें पाहून तर मला फारच आनंद होत आहे. माझी त्यांना हात जोडून अशी विनंती आहे कीं, राजा करणसिंह आह्मां लोकांवर जी जुलुमजबरदस्ती करीत आहे, त्याची त्यांनीं कसोशीनें चौकशी करावी. आह्मी लोक त्याची जुलुमजबरदस्ती शाबीत करण्यास तयार आहों."

हें त्या नवख्या मनुष्याचें भाषण ऐकून नेपाळचा सेनापति खड्गसिंह जवळच्या एका सरदाराकडे वळून ह्मणालाः— "अनिरुद्धसिंह हा कोण आहे?"

अनिरुद्ध०— (हात जोडून) राजानें ज्यास दरवडेखोर ठरविलें आहे, त्या प्रसिद्ध नाहरसिंहाचा हा सांथीदार असून याचें नांव सोमनाथ आहे व हा आमच्या कटांत सामील होण्याची इच्छा करीत आहे.

खड्ग०— ज्या नाहरसिंह दरवडेखोरानें सर्व हरिपुरच्या रयतेस त्राही त्राही करून सोडलें आहे, त्या नाहरसिंहाचा तूं सांथीदार आहेस काय ?

सोम०— नाहरसिंह हरिपुरच्या रयतेस बिलकुल त्रास देत नसतो. तो फक्त राजाचाच खजिना लुटतो व राजानें अन्यायानें बंदींत टाकलेल्या लोकांस तो सोडवितो. या हरिपूर राज्यांतील एकही मनुष्य आपणांस नाहरसिंहाविरुद्ध कांहीं सांगणार नाहीं, अशी माझी खात्री आहे.

खड्ग०— (अनिरुद्धसिंहाकडे पाहून) काय ? हा ह्मणतो ती गोष्ट खरी आहे ?

अनि०— होय. तो ह्मणतो, तें सर्वस्वीं खरें आहे. नाहरसिंह मोठा इमानी, एकनिष्ठ, धर्मात्मा, दयाळू, व शूर पुरुष आहे. तो प्रजेला त्रास देत नाहीं, इतकेंच नव्हें, पण तो हरिपुरच्या गरीब प्रजेस पैसे देतो, गरिबांचें दुःख दूर करितो व ब्राह्मणादि श्रेष्ठ लोकांना मदत करितो. फक्त करणसिंहासच तो छळतो, त्यासच त्रास देतो, त्याचाच खजिना लुटून लोकांस धर्म करितो व आपला गुजारा करितो.

खड्ग०— असें असेल तर खरोखर नाहरसिंह मोठा धर्मात्मा व बहादूर मनुष्य दिसतो. (सोमनाथाकडे पाहून) परंतु, मग त्यानें राजाच्या मुलाचा खून करणाऱ्या वीरसिंहास कसें सोडवून नेलें ? वीरसिंह तर फांशीच्या शिक्षेलाच योग्य होता. नाहरसिंह याचा कांहीं जबाब देऊं शकेल काय ?

अनि०— नाहरसिंहानें वीरसिंहास सोडवून नेल्यापासून आजच या मनुष्याची व आमची गांठ पडली. ज्यानें राजपुत्राचा खून केला, त्याला नाहरसिंहानें कसा सोडविला याबद्दल चौकशी करण्याचा आमचा त्या दिवसापासून विचार होता; परंतु, तेव्हांपासून याची गांठ न पडल्यामुळें आह्मांला चौकशी करितां आली नाहीं. नाहरसिंह असें करील असें आह्मांला वाटलें नाहीं. आह्मी राजाचा द्वेष करीत असलों, तरी राजपुत्राचा खून व्हावा व खुनी पळून जावा, अशी आमची बिलकुल इच्छा नाहीं; वीरसिंहाच्या हातून हें दुष्ट कृत्य कसें झालें, याचेंच आह्मांला फार आश्चर्य वाटत आहे. तो मोठा प्रामाणिक, पापभीरू, व सच्चा मनुष्य आहे. आह्मी राजापेक्षांही त्याला जास्त मानतों; कारण, या राज्यांतील सर्व अधिकाऱ्यांमध्यें एकटा वीरसिंह मात्र दयाळू असून प्रजेवर त्याचें मुलाप्रमाणें प्रेम होतें; असें असून मला आश्चर्य........

सोम०— याचा उलगडा मी करीन व असें सिद्ध करून देईन कीं, नाहरसिंहाचें कृत्य उत्तम असून वीरसिंह केवळ निरापराधी आहे.

खड्ग०— नाहरसिंह व वीरसिंह यांचा निरापराधीपणा सिद्ध झाला, तर आह्मी त्यास आपल्या कटांत घेऊं. सोमनाथ, ऐक; येथील प्रजेचीं गाऱ्हाणीं व नाहरसिंहानें नेपाळच्या राजास केलेले अर्ज, यांची चौकशी करण्याकरितां मला येथें मुद्दाम पाठविण्यांत आलें आहे व मला तें काम इमानें इतबारें करावयाचें आहे. (लोकांकडे पाहून) हे सर्व लोक मला जाणीत आहेत व त्यांचा मजवर पूर्ण विश्वासही आहे; ह्मणूनच यांच्या या गुप्त कारस्थानांत मला त्यांनीं घेतलें आहे व ते खऱ्या खऱ्या गोष्टी मला स्पष्टपणें सांगत आहेत; त्याप्रमाणें तूंही खरें सांग. वीरसिंहाच्या निरापराधित्वाबद्दल तुला काय सांगावयाचें आहे, सांग पाहूं?

सोम०— वीरसिंह कोण आहे? व त्याची योग्यता किती मोठी

आहे? हें मी पुढें केव्हां तरी सांगेन. आज फक्त त्याच्या निरापराधीपणाबद्दल इतकेंच सांगतों कीं, वीरसिंहानें राजपुत्रास मारलें नसून त्याच्यावर हें कुभांड रचलेलें आहे. राजपुत्र अद्याप जिवंत असून त्यास महाराजांनीं दडवून ठेविलें आहे. माझ्याबरोबर गुप्त रीतीनें याल तर मी तुह्मास राजपुत्र दाखवून देईन.

खड्ग०— राजपुत्र सूरजसिंह जिवंत आहे ह्मणतोस?

सोम०— होय सरकार.

खड्ग०— फक्त एवढीच गोष्ट जर तूं आमच्या प्रत्ययास आणून देशील, तर येथील प्रजेचीं गाऱ्हाणीं खरीं समजून, जास्ती चौकशी न करितां मी करणसिंहास कैद करून नेपाळास घेऊन जाईन.

सोम०— एवढीच नव्हे, पण अशा अनेक जुलमाच्या गोष्टी सिद्ध करण्यास मजजवळ भरपूर पुरावा आहे व तो आपणापुढें मांडण्यास मी वाटेल तेव्हां तयार आहे.

खड्ग०— (तरवारीवर हात ठेऊन) असें आहे तर आह्मी वीरसिंहाचें रक्षण करण्यास आतांपासूनच तयार आहों; मात्र नाहरसिंहानें स्वतः आमच्यापुढें आलें पाहिजे.

सोम०— नाहरसिंहाची बाजू खरी ठरली तर त्याशीं दगा करणार नाहीं, अशी शपथ वाहिल्याशिवाय तो आपलेपुढें येऊं शकणार नाहीं. तो खोटा ठरेल तर त्यास वाटेल ती शिक्षा देण्यास आपण मुकत्यार आहां. जर आपण शपथ घ्याल, तर या वेळींही नाहरसिंह वीरसिंहासह येथें येऊन उभा राहील.

इतकें ऐकल्याबरोबर खड्गसिंहासहीत जमलेल्या सर्व सरदारांनीं तरवारीवर हात ठेऊन शपथ घेतली कीं, "वीरसिंह निरापराधी आहे, हें सिद्ध झालें तर नाहरसिंहास आह्मी दगा करणार नाहीं, इतकेंच नव्हें तर त्याच्याशीं स्नेहाचें वर्तन ठेवूं." सर्वांनीं अशा प्रकारें शपथ घेतल्याबरोबर सोमनाथानें आपलें तोंडावरील बुरखा

काढला व म्यानांतून तरवार उपसून तो मोठ्यानें ह्मणाला:– "आपणांसमोर उभा राहून मी शपथ घेतों कीं, जर नाहरसिंह खोटा ठरला तर तो आपल्या हातानें आपलें शीर या तरवारीनें उतरून देवीस अर्पण करील ! महाराज, माझेंच नांव नाहरसिंह. मींच आपणास सोमनाथ हें नांव घेतलें होतें."

दिव्याचा प्रकाश एकदम नाहरसिंहाच्या चेहऱ्यावर पडला व सर्व लोक त्याजकडे एकमक पाहूं लागले. त्याचा आवेश, आणि त्याची उमदी व गंभीर चर्या पाहून सर्व लोक अगदीं चकित् झाले. खड्गसिंहानें तर उठून त्याला कवटाळलें व तो ह्मणाला:— "खरोखर तूं बहादर आहेस. अशा वेळीं तूं आपलें नांव जाहीर केलेंस, हें काम सामान्य नव्हे. देवीच्या कृपेनें तुझें सर्व ह्मणणें खास खरें ठरेल, यांत संशय नाहीं. (लोकांकडे पाहून) लोकहो, या बहादराला तुह्मी प्रेमानें भेटा. हाच तुमचे सर्व कष्ट दूर करील." सर्व लोक नाहरसिंहास प्रेमानें भेटले व खड्गसिंहानें त्यास आपल्या उजव्या हाताशीं अर्ध्या गादीवर जागा दिली; तेव्हां नाहरसिंह ह्मणाला:— "वीरसिंहाला मी बाहेर दरवाजावर सोडून आलों आहें."

खड्ग०— तुह्मीं त्यास बरोबर आणलें होतें काय ?

नाहर०— होय.

खड्ग०— तर मग त्यास आंत बोलावून आणलें पाहिजे. (एका सरदाराकडे पाहून) आपणच जाऊन त्यास घेऊन या.

सरदार०— बरें आहे.

सरदार उठला व वीरसिंहास आणण्याकरितां बाहेर देवडीवर गेला. बऱ्याच वेळानें तो त्यास घेऊन परत आला; तेव्हां खड्गसिंहानें विचारिलें:— "इतका उशीर कां लागला ?"

सरदार०— हे हिंडत हिंडत बरेंच लांब गेले होते.

नाहर०— वीरसिंह, इकडे ये व आपल्या तोंडावरील बुर्खा काढ. आज आपला अज्ञातवास संपला असें तूं समज.

हें ऐकून वीरसिंहानें मान हालवून बुर्खा काढण्याचें नाकारलें.

नाहर०— बुर्खा दूर करण्याचें तूं नाकारतोस, याचें मला आश्चर्य वाटतें. माझ्या मुखानें यांनीं तुझी सर्व हकीकत ऐकिली आहे, तर आतां बुर्खा काढण्यास तूं कां भितोस? वीरसिंह, मी तुला बहादूर व सिंहाचा बच्चा समजत असून तूं हें काय करीत आहेस?

वीरसिंहानें मान हालवून बुर्खा काढण्याचें पुन्हां नाकारलें व तो दोन तीन कदम मागें हटला. तेव्हां नाहरसिंहास फार वाईट वाटून तो उठला व वीरसिंहाजवळ जाऊन त्यानें त्याचें मनगट धरलें व त्याजकडे तो रागानें पाहूं लागला. मनगट पकडल्याबरोबर नाहरसिंहास संशय येऊन त्यानें त्याजकडे खालपासून वरपर्यंत निरखून पाहिलें व तो खड्गसिंहाकडे वळून ह्मणालाः— "वीरसिंह इतका भित्रा व कमहिमतीचा नाहीं व माझा हुकूम तो मानणार नाहीं, असेंही नाहीं. परंतु, हा पहा कसा नजरबंदीचा खेळ आहे. बेइमान राजानें आह्मांस कसें धोक्यांत घातलें आहे पहा! हरहर!! वीरसिंह पुन्हां कोणत्या संकटांत पडला, कांहींच कळत नाहीं." इतकेंच बोलत नाहरसिंहानें त्या मनुष्याच्या तोंडावरील बुर्खा ओढून दूर फेंकून दिला; तेव्हां सगळ्या लोकांच्या एकदम लक्षांत आलें कीं, तो वीरसिंह नसून महाराजांचा नौकर बचनसिंह आहे.

खड्ग०— नाहरसिंहजी, हा काय प्रकार आहे?

नाहर०— हा एक मोठाच चमत्कार आहे. तोंडावरील बुर्खा आपणास काढावा लागणार नाहीं, असें समजून हा मनुष्य बेलाशक आंत आला; पण, याचें वाटणें अगदींच उलटें पडलें. आपल्या कटाचा भेद खास झाला आहे; मग तो कोणीं केला आहे, हें आतांच मला सांगतां येत नाहीं. याला मी चांगला ओळखतों. वीरसिंहास कैद केल्यावर

त्याच्या बागेंत मोहोर चोरण्यास गेलेला हाच तो पाजी मनुष्य; परंतु, मी त्यावेळीं तेथें असल्यामुळें याचें कार्य सिद्ध झालें नाहीं. मोहोर नेऊन राजाला आणखीं काय काय गोष्टी रचावयाच्या होत्या कोण जाणें ?

खड्ग०—(नाहरसिंहाजवळ जाऊन) खचित, आपण संकटांत सांपडलों आहों. आपल्या या कटाची बातमी खचित् करणसिंहास कळली असावी व या जमलेल्या लोकांतीलच कोणी तरी भेद्या असावा खास !!

नाहर०— असेंच कांहीं तरी खास आहे !! पण सध्यां आपणांस बाहेर जाऊन वीरसिंहाचा शोध केला पाहिजे. त्याजवर काय संकट आलें आहे कोण जाणें ? या मनुष्यास मात्र चांगल्या बंदोबस्तानें ठेविलें पाहिजे.

हा प्रकार पाहून जमलेल्या लोकांत मोठी गडबड उडाली. क्रोधानें सर्वांचे चेहरे फिरून गेले. इतक्यांत एका सरदारानें पुढें सरून बचनसिंहास लाथेनें खालीं पाडिलें व विचारिलें:— " खरें बोल, वीरसिंह कोठें आहे ? नाहीं तर पहा, आतांचे आतां तुझें डोकें उडवितों. " बचनसिंहानें याला उत्तर दिलें नाहीं, तेव्हां तो खड्गसिंहास ह्मणतो:— " याला माझ्या स्वाधीन करून तुह्मी वीरसिंहाच्या शोधास जा. मी याचा चांगला समाचार घेतों. " खड्गसिंहानें 'काय करावें' ह्मणून नाहरसिंहास खुणेनें विचारिलें. नाहरसिंहानें त्याच्या कानांत सांगितलें:— " या सरदारावरच माझा वहीम आहे. " खड्गसिंह ह्मणाला:— " मलाही असेंच वाटतें. "

खड्गसिंहानें त्या सरदारास, (त्याचें नांव हरिहरसिंह होतें,) व बचनसिंहास दुसऱ्या सरदारांच्या ताब्यांत देऊन सांगितलें:— " आमच्याशीं बेइमानी करणारांचा शोध लागला आहे. सध्यां जास्त बोलण्यास फुरसत नाहीं; तरी तुह्मी या दोघांस कैद करा. आह्मी कांहीं कामाकरितां बाहेर जाऊन येतों. "

खड्गसिंह आणखी तीन सरदारांसह नाहरसिंहाला घेऊन वाड्यां-तून जलदीनें बाहेर पडला. दरवाजाशीं आल्यावर नाहरसिंहानें पहारेवाल्यास विचारिलें कीं, "मी ज्या मनुष्यास येथें बसविलें होतें, तो मी आंत गेल्यावर येथेंच होता कीं कोठें गेला होता ?"

पहारे०— तो इकडे तिकडे पहात येथेंच आसपास फिरत होता. इतक्यांत एकानें त्यास दूर बोलावून नेलें. कांहीं वेळानें तो परत आला व आपल्या हुकुमाप्रमाणें एका सरदारानें त्यास आंत नेलें.

नाहर०— (खड्गसिंहास) कांहीं उलगडा पडत नाहीं.

खड्ग०— कांहीं चिंता नाहीं. पुढें चला.

नाहर०— हरहर !! बिचाऱ्या वीरसिंहाचें........

खड्ग०— तुह्मी काळजी करूं नका. पहा आतां मी काय करतों तें !!

पांचही इसम पुढें निघाले. एक मशालजीही त्यांनीं बरोबर घेतला होता, तो सर्वांपुढें चालला होता. नाहरसिंहानें आपलें तोंडावर बुरखा घेतला. थोडेंसें पुढें गेल्यावर त्यांना सडकेवर एक प्रेत पडलेलें आढ-ळलें व सभोंवतीं जमिनीवर बरेंच ठिकाणीं रक्त सांडलेलें त्यांना दिसलें.

प्रकरण १० वें.

हरिपुरच्या राजवाड्यांत राजा करणसिंह आपले दोन कारभा-ऱ्यांसह दिवाणखान्यांत कांहीं गोष्टी सांगत बसला होता. दोन हुजरेही बाजूस हात जोडून उभे होते. त्या दोन कारभाऱ्यांपैकीं एकाचें नांव शंभुदत्त व दुसऱ्याचें नांव सरूपसिंह होतें.

राजा०— रामदासाचा पत्ता नाहींसा झाल्यापासून मला चैन पडत नव्हतेंच; पण हरिसिंहही एकाएकीं नाहींसा झाल्यामुळें तर मला अगदींच सुचेनासें झालें आहे.

शंभु०— रामदासाला कामगिरीवर पाठविला आहे, तेव्हां काम न झाल्यामुळें कदाचित् तो आला नसेल; पण हरिसिंहास तर कोठें कामगिरीवरही पाठविलें नव्हतें; मग त्याचा बेपत्ता कसा झाला? कांहींच समजत नाहीं.

सरूप०— हा सर्व त्या दुष्ट नाहरसिंहाचा खेळ आहे.

राजा०— निःसंशय त्याचाच खेळ आहे. तो माझ्या अगदीं हात धुवून पाठीस लागला आहे; मग मीं त्याचें काय केलें आहे कोण जाणें? तो असा सैतान आहे कीं, प्रत्येक कामांत त्याची भीति बाळगावी लागते व प्रत्येक ठिकाणीं तो दत्त ह्मणून हजर असतोच. वीरसिंहाला कैदेंतून पळवून नेऊन त्यानें आमचे शेंकडों दिवसांचे श्रम मातीमोल केले. बचनसिंहाचे हातची मोहोर हिसकावून घेऊन त्यानें आमचा सर्व पुढील व्यूह ढासळून टाकला. असे एक कां दोन प्रकार ह्मणून सांगावें?

सरूप०— तें असो. पण छोट्या महाराजांना आपण असें किती दिवस लपवून ठेवणार? कधींना कधीं तरी त्यांना बाहेरं काढावें लागेलच.

राजा०— वीरसिंहाला फांशी देऊन मग त्यास बाहेर काढण्याचा व वीरसिंह विनाकारण फांशी दिला गेला, याबद्दल मग मनस्वी दुःख दाखवावयाचें, असा माझा बेत होता; पण, नाहरसिंहानें त्यास सोडवून नेल्यामुळें मोठी फसगत झाली आहे.

सरूप०— येथील रयत वीरसिंहास फारच मानते; यामुळें वीरसिंहानें सूरजसिंह महाराजांचा खून केला, ही गोष्ट त्यांना खरी वाटणार नाहीं.

राजा०— तेवढ्याचकरितां तर मोहोर आणविण्याची तजवीज होती; पण, एकही गोष्ट सिद्धीस गेली नाहीं.

शंभु०— येथील रयतेनें आपल्याविरुद्ध फारच धामधूम चाल-विली आहे. एक हरिहरसिंह आपल्या पक्षाचा असल्यामुळें येथील मोठमोठ्या लोकांनीं जो कट करूं घातला आहे, त्याची इत्थंभूत हकीकत आपणांस समजते. पण, अद्यापही आपण जर त्यांच्या-कडे कानागाडा केला, तर एक दिवस आपणांवर मोठाच गहजब गुदरणार आहे, तर याचा कांहीं तरी अवश्य विचार लवकरच केला पाहिजे.

राजा०— काय विचार करावा, हेंच तर मला सुचत नाहीं. त्या लोकांवर कांहीं आरोप न ठेवितां त्यांना कैद करावें, तरीही दंगा होण्याची भीति आहेच. काय करूं? हा सर्व खेळ त्या नाह-रसिंहाचाच आहे. खरोखर लहानपणींच जर वीरसिंहास मारून टाकिलें असतें, तर फार उत्तम झालें असतें; पण, रयतेस तो इतका प्यार होईल, हें त्या वेळीं कोणास समजलें होतें? त्यानें तर माझी सर्व प्रजा आपल्या मुठींत ठेविली आहे. आतां खड्गसिंह नेपाळांतून चौकशी करण्यास आला आहे, पहावें तो काय करितो तें. हरिहर-सिंहाच्याकडून तर समजलें कीं, येथील लोकांनीं त्यास आपल्या पक्षास मिळवून घेतलें आहे.

सरूप०— त्यांच्या आजच्या सभेचीही हकीकत काय आहे, ती लवकरच समजेल.

राजा०— बचनसिंहही २०।२५ लोक बरोबर घेऊन तिकडेच गेला आहे. तो काय करितो पहावें!

सरूप०— खड्गसिंह २००।४०० लोकांसह आला आहे. एक-दादुकटा आला असतां तर त्याचाही समचार घेतला असता.

राजा०— (हंसून) नाहीं तर काय मी त्यास सोडीन वाटतें?

नेपाळ येथून दूर आहे. खड्गसिंहाच्या लोकांस त्याची काय हवाल झाली, हेंही समजून देणार नाहीं; व नेपाळच्या महाराजांस लिहून पाठवीन कीं, 'माझ्या रयतेला त्रास देऊन तो कोणीकडे पळून गेला कळलें नाहीं.' म्हणजे तर सर्व काम बेमालूम होईल. मग फक्त सुजनसिंहाच्या बाबतींत विचार करणें उरलें. तो केव्हांही करतां येईल.

अशा तऱ्हेनें गोष्टी बोलतां बोलतां बरीच रात्र झाली. एक तासभर रात्र राहिली असेल नसेल, तोंच समोरचा दरवाजा खाडदिशी उघडला व चार मनुष्यें एक प्रेत घेऊन दिवाणखान्यांत आलीं.

प्रकरण ११ वें.

आतां तारेची थोडीशी हकीकत या प्रकरणांत सांगण्याचा विचार आहे. तारा शुद्धीवर नव्हती, तिला आपल्या जिवाचीही बिलकुल आशा राहिली नव्हती. तिचा बाप सुजनसिंह तिला वार करण्यास अगदीं तयार झाला होता व ताराही बीरसिंहाची जिवंत राहण्याची आशा सोडून मरण्यास तयार झाली होती. परंतु, ईश्वरी संकेतानें तिचा मृत्यु यावेळीं नेमलेला नव्हता. सुजनसिंहानें तारेवर घाव घालण्याकरितां आपले तरवारीचा हात वर केला, तोंच दोन इसम एकाएकीं तेथें येऊन पोंचले व एकानें सुजनसिंहाचे हातांतील तरवार वरच्यावर अल्लाद काढून घेतली व दुसऱ्यानें त्यास धक्का मारून खालीं पाडलें. सुजनसिंहही झटदिशीं उठून एकाबरोबर कुस्ती खेळण्यास तयार झाला व त्यानें त्याचें खवाटें धरिलें. ही इकडे यांची कुस्ती चालली असतांच दुसऱ्यानें तारेला

उचलून आपल्या खांद्यावर घेतलें व विचित्र भाषेंत आपल्या स्नेहास कांहीं सांगून त्यानें आपला रस्ता सुधारला. तारा अगदींच बेशुद्ध झाली होती. बऱ्याच वेळानें ती सावध होऊन पहाते, तों आपण एका पर्णकुटिकेंत पडलों असून जवळच एक धुमी पेटलेली आहे व तेथें लांबलांब जटा व दाढी असलेला एक साधु सर्वांगाला भस्म लावून आपल्याकडे टक लावून बसला आहे. तारेनें डोळे उघडलेले पाहून साधु तीस ह्मणालाः— ' तारे, भिऊं नको व घाबरूं नको. ' हे मृदु व मायाळूपणाचे शब्द तारेच्या कानांवर पडतांच तिच्या निवांत जीव आला; व ती उठून बसली. तेव्हां साधु पुन्हां ह्मणतोः— " तारे, तुझें नांव ताराच आहे कीं मी चुकलों ? "

तारा०— (हात जोडून) महाराज, माझेंच नांव तारा आहे.

नंतर साधूनें पर्णकुटिकेच्या एका कोपऱ्यांत दोन डाळिंबें होतीं, तीं आणून तारेस दिलीं व ह्मणालाः— " तारे, हीं आधीं तूं खा. ह्मणजे तुला थोडीशी हुशारी वाटेल. मग आपण काय बोलावयाचें तें बोलूं. " तारेच्या जिवास मुळींच चैन पडत नव्हतें. वीरसिंहासंबंधीं नानाप्रकारचे विचार तिच्या मनांत येऊन तिचे डोळे पाण्यानें अगदीं भरून येत व बापाच्या हातून मी मारली गेलें असतें, तर फार बरें झालें असतें, असें तिला वाटे. तारेनें डाळिंबें खाण्याचें नाकारिलें. पण साधूच्या अत्याग्रहावरून तिला तीं खावींच लागलीं. हात धुण्याकरितां जेव्हां ती कुटिकेच्या बाहेर आली, तेव्हां तिला समजलें कीं, ती पर्णकुटिका एका नदीचे कांठीं असून भोंवतालीं अफाट मैदान होतें. ही वेळ भर दोनप्रहरची होती. तारेनें हात धुतले व ती पुन्हां पर्णकुटिकेंत जाऊन बसली; तेव्हां साधूनें तिला विचारिलें:— " तारे, आतां तूं आपलें सर्व वृत्त खरें खरें मला सांग पाहूं ? "

तारा०— आपण जर माझ्यावर उपकार केले आहेत; तर मी आपणांस खोटें काय ह्मणून सांगेन ?

साधु०— हा माझ्यासमोर अग्नि आहे, याच्याच साक्षीनें मी तुला सांगतों कीं, तुझें कल्याण करण्याशिवाय अन्य कांहींच मला सुचत नाहीं. बरें तें असो. आतां सांग पाहूं, तूं कोण आहेस व तुझ्यावर कोणतें संकट आलें आहे ?

तारा०— राजा करणसिंहाचा खजिनदार सुजनसिंह, त्याची मी कन्या आहें.

साधु०— जिचें लग्न वीरसिंहाबरोबर झालें आहे, तीच तूं ?

तारा०— होय, महाराज.

साधु०— सुजनसिंह तुझा बाप झाला ह्मणून काय झालें, मला इतकें स्पष्ट ह्मणण्यास भीति वाटत नाहीं कीं, तो मोठा हरामखोर, दगलबाज व पाजी मनुष्य आहे. परंतु, वीरसिंह मात्र मोठा उमदा, उदार, शूर, प्रामाणिक व धर्मात्मा पुरुष आहे. बरें तारे, तूं जर सुजनसिंहाची मुलगी आहेस तर राजाचे घरीं तुझें नेहमीं जाणें येणें असेल ?

तारा०— होय. पूर्वीं तर मी महिनेच्या महिने राजवाड्यांतच रहात असें. पण, अलीकडे मी राजवाड्यांत जात नसे इतकेंच नव्हे, तर माहेरीसुद्धां माझें जाणें येणें बंदच आहे.

साधु०— तें कां बरें ?

तारा०— ते दोघेजण माझ्या जिवावर उठले ह्मणून !!

साधु०— दोन्हीं ठिकाणीं तुझें जाणें येणें बंद झालें, याचें कारण मागाहून ऐकूं; पण, प्रथमतः मला तूं असें सांग कीं, " कटोराभर रक्त " हे शद्ब ऐकिल्याबरोबर तुझा बाप जो अगदीं घाबरून जातो, याचें कारण काय बरें ?

तारा०— (भिऊन) शिव शिव !! मलासुद्धां ते शद्ब ऐकून

भीति वाटते; तथापि ती हकीकत मी आपणांस सांगतें. पण, ती फारच गुप्त गोष्ट आहे.

साधु०— मी शपथ वाहिलीच आहे कीं, ' माझ्या हातून तुझें कल्याणच होईलच. अकल्याण कधींही होणार नाहीं. ' मग तूं कां बरें भितेस ?

तारा०— महाराज, तुह्मी माझें रक्षणकर्ते आहांत; व तुमच्याच कृपेनें मी जिवंत राहिलें आहें; तेव्हां मला आपली हकीकत आपणांजवळ सांगण्यास कांहींच हरकत नाहीं.....

तारा अशा तऱ्हेनें सांगत असतां साधुमहाराजांचे डोळे अश्रूनें भरून आले; तेव्हां त्यांनीं समोरच्या धुमींतील राख आपल्या डोळ्यास लावून ते ह्मणालेः— " तारे, ही ईश्वराची कृपा समज. मी निमित्तमात्र आहें. बरें, असो. तूं ती हकीकत सांगतेस ना ? "

तारा०— पण ती हकीकत सांगतांना मला माझीही कांहीं हकीकत सांगावी लागेल.

साधु०— कांहीं हरकत नाहीं. तीही मी ऐकण्यास तयार आहे.

तारा०— महाराज, सांगतें ऐकावें. मी लहानपणापासून राजवाड्यांत जात येत असे व तेथें कित्येक दिवस रहातही असे. तेथें अहिल्या नांवाची दुसरी एक मुलगी होती. ती मजपेक्षां मोठी होती, तरी तिचें माझें रहस्य चांगलें असे. अहिल्येचे आईबाप कोण व तिचे कोणी नातलग आहेत कीं नाहींत, याची मला माहिती नव्हती. मीं अहिल्येला त्यासंबंधानें पुष्कळ वेळां विचारलें; पण, तिनें डोळ्यांतून पाणी काढण्याशिवाय मला कांहींच उत्तर दिलें नाहीं. वीरसिंह महाराजांची व माझी लहानपणापासून ओळख होती व अहिल्याही त्यांजवर बंधूप्रमाणें प्रेम करी. अहिल्येवर राजाचें प्रेम होतें व तिच्याच सांगण्यावरून माझें वीरसिंहाबरोबर लग्न झालें.

साधु०— अहिल्येचें नांव अहिल्याच होतें कीं दुसरें कांहीं होतें ?

तारा०— तिचें दुसरें नांव माझ्या कधीं ऐकण्यांत आलें नाहीं; पण, एका भयंकर प्रसंगीं तिचें दुसरें नांव आहे, हें मला समजलें.

साधु०— तें कोणतें बरें !!

तारा०— तें मी पुढें सांगेनच. आपण पुढील हकीकत ऐकावी.

साधु०— ठीक आहे. ऐकतों.

तारा०— राणीनें राजास पुष्कळ वेळ सांगितलें कीं, अहिल्या बरीच मोठी झाली, तरी आतां तिचें लग्न करून टाकावें. परंतु राजानें ती गोष्ट मंजुर केली नाहीं. पुढें राणीच्या व राजवाड्यांतील इतर स्त्रियांच्या असें आढळण्यांत आलें कीं, राजाची अहिल्येवर दुष्ट दृष्टी असल्यामुळेंच तो तिचें लग्न करून देत नाहीं.

साधु०— हरामखोर, पाजी, बेइमान !!! बरें पुढें ?

तारा०— ती गोष्ट राणीच्या अंतःकरणास फारच लागली व त्याबद्दल तिचीं राजाबरोबर कितीएक वेळ भांडणेंही झालीं. अखेर अहिल्येचें लग्न कधीं मी करूं देणार नाहीं, असें राजानें एक दिवस राणीस स्पष्ट सांगितलें.

साधु०— बरें, मग काय झालें ?

तारा०— राणीला तें ऐकून अत्यंत दुःख झालें; अहिल्येचें तोंडही उतरून गेलें व तिनें राजाच्या समोर जाण्याचें बंद केलें. पुढें तीन चार दिवसांनीं अहिल्या आपल्या महालांतून एकाएकीं नाहींशीं झाली. राजानें तिचा पुष्कळ शोध केला, कित्येक दासीस त्यानें मरें मरेंतों मारलें, कित्येकांस हांकून दिलें व राणीबरोबर भाषण करणेंही त्यानें सोडून दिलें, तरी अहिल्येचा पत्ता लागला नाहीं.

साधु०— अहिल्येचा अजूनही शोध लागला नाहीं कां ?

तारा०— मी तेंच आतां सांगणार आहें. या गोष्टीस बरींच वर्षे लोटल्यावर एके दिवशीं एक दासी राणीस असें सांगतांना मीं ऐकिलें कीं, 'अहिल्येला दुसरा मुलगा झाला. तिची पहिली मुलगी तीन वर्षांची झाली आहे. अहिल्येच्या नवऱ्याचें तिच्यावर चांगलें प्रेम आहे व तीं आनंदानें संसार करीत आहेत.' माझें लग्न अहिल्येच्या देखत झालें होतें व मी सासरीं राहूंही लागलें होतें. अहिल्या नाहींशी झाल्याचें ऐकून मला व त्यांनाही फार वाईट वाटलें व भीतीनें राजवाड्यांत जाणें येणें मीं कमी केलें; परंतु, दासीनें राणीसाहेबांस सांगितलेली अहिल्येची हकीकत ऐकिल्या दिवसापासून आह्मां दोघांनाही फार आनंद झाला व आमची कल्पना झाली कीं, राणीनेंच अहिल्येला कोठें दूर गुप्त रीतीनें पाठवून तिचें लग्न करून दिलें. पुढें चौकशी करितां आह्मांला असेंही समजलें कीं, राणीनें तिला आपल्या बापाच्या गांवीं पाठविलें.

साधु०— तुझ्या सासरीं कोण कोण आहे ?

तारा०— नांवाचें मात्र सासर. बाकी माझ्या सासरचें खरें नात्याचें कोणीच नाहीं. माझे मामंजी तिकडे लहान असतांनाच मरण पावले व राजानें त्यांचें पालन केलें. राजा त्यांना चांगलें मानतो; पण, तिकडून नेहमीं ह्मणणें होतें कीं, 'राजा बेइमानी आहे. त्याचें माझें एक ना एखादे दिवशीं चांगलें भांडण होणार !'

साधु०— बरें, पुढें काय झालें ?

तारा०— पुढें बरेच दिवसांनीं राणीसाहेबांनीं मला राहण्यास बोलाविल्यावरून मी राजवाड्यांत गेलें व ३।४ दिवस तेथेंच राहिलें. तेव्हां एके दिवशीं रात्रीं मी महालांत पलंगावर निजलें होतें; राणीसाहेबही जवळच्याच पलंगावर निजल्या होत्या; इकडे तिकडे बऱ्याच दासीही निजल्या होत्या. राणीसह त्यांना झोप लागली होती; पण मला मात्र झोप आली नाहीं. इतक्यांत पुढील शब्द

माझ्या कानांवर पडलेः— "अरेरे, बिचारी अहिल्या अखेर फसून राजाच्या हातीं लागलीच!! चला, आपण दिवाणखान्यावरील घुमटाच्या झरोक्यांतून तिचा प्राण घेतात कीं काय तें पाहूं व मग राणीसाहेबांना उठवूं."

इतके शब्द माझ्या कानांवर पडल्याबरोबर मी एकदम उठून बसलें. माझें काळीज धकधक उडूं लागलें. मी पलंगावरून खालीं उतरलें व दिवाणखान्यावरील घुमटाकडे चाललें. त्या घुमटाला असे ४।५ झरोके ठेविले आहेत कीं, त्यांतून पाहिल्यास दिवाणखान्यांत काय चाललें आहे तें सर्व दिसतें. मी तेथें जाऊन पोंचण्यापूर्वींच दोन स्त्रिया तेथें जाऊन पोंचल्या होत्या.

साधु०— त्या स्त्रिया कोण होत्या?

तारा०— त्या दोघी राणीच्या दासी होत्या. मला पाहिल्याबरोबर त्या मजकडे आल्या व हात जोडून ह्मणाल्याः— "गुपचुप रहा. जर आपण येथें आहांत, असें महाराजांना समजलें तर आपणा सर्वांचे ते प्राण घेतील." मीं त्यांना सांगितलें कीं, तुह्मी भिऊं नका. मी अगदीं सावधगिरीनें राहीन.

हा दिवाणखाना जुना होता. राजानें आपणाकरितां नवा दिवाणखाना बांधल्यापासून हा पडूनच राहिला होता. यांत दिवाही लागत नव्हता. यांत भुतेंखेतें आहेत, असें समजून इकडे कोणीही येत नव्हतें. मीं झरोक्यांतून पाहिलें तों अहिल्या खालीं मान घालून रडत असलेली मला दिसली. एका कोपऱ्यांत चारपांच कुदळी पडल्या होत्या व दुसरीकडे पाण्यानें भरलेले वीसपंचवीस घडे होते. राजा अहिल्येच्या समोर तिजकडे पहात उभा राहिला होता व त्याच्या मागें माझा बाप सुजनसिंह व राजाचे कारभारी रामदास व हरिसिंह उभे होते. माझ्या बापाजवळ एक तीन वर्षांची मुलगी होती. ती मुलगी फारच सुरेख व मोहक दिसत होती. राजा अहि-

स्येला ह्मणाला:— " सुंदरी, तूं माझें ऐक व आनंदानें तूं माझा स्वीकार कर "

साधु०— काय नांव घेतलेंस ? सुंदरी ?

तारा०— होय. सुंदरी. याचवेळीं मला कळलें कीं, तिचें दुसरें नांव सुंदरी हें आहे.

साधु०— बरें, मग काय झालें ?

तारा०— सुंदरीनें मान हालवून नकार दिला.

साधु०— मग ?

तारा०— राजा " ह्मणाला, सुंदरी, तूं जर माझें ह्मणणें मान्य केलें नाहींस, तर पस्तावशील. मी तुझ्यावर जुलूम करून आपली इच्छा पूर्ण करून घेईन. सुंदरी, तूं जर मला वश होशील तर तुला मी पट्टराणी करीन, इतकेंच नव्हें तर त्या राणीससुद्धां तूं सांगशील तर ठार मारीन. यावर सुंदरीनें रागानें उत्तर दिलें:— " अरे दुष्टा, बेहद्द तूं हें बहकतोस ? तूं साक्षात् इंद्र जरी असलास, तरीसुद्धां माझें मन फिरणार नाहीं, हें पक्कें समज. "

साधु०— शाबास !! मग काय झालें ?

तारा०— नंतर राजानें माझ्या बापाला कांहीं खूण केली, त्याबरोबर त्यानें आपलेजवळ असलेल्या त्या मुलीचे पाय बांधून तिला खुंटीला उलटें टांगलें व खंजीर उपसून तिच्यापुढें उभा राहिला. बिचारी ती पोर व सुंदरी मोठमोठ्यानें रडूं लागलीं. राजा पुन्हां सुंदरीला ह्मणाला:— " सुंदरी, पहा अजून तरी माझें ह्मणण्यास कबूल हो; नाहीं तर या तुझ्या पोरीला ठार मारून तिच्या रक्तानें तुला न्हाऊं घालीन. " सुंदरी ह्मणाली:— " ईश्वरी संकेताप्रमाणें जें होणें असेल तें होईल; पण, मी आपला धर्म सोडणार नाहीं. मी आपले पतिराजांबरोबर दगलबाजी करून भलत्याच मनुष्याचा हात धरूं ? हें कधींही घडणार नाहीं. "

राजानें हरिसिंहाला व माझ्या बापाला कांहीं इशारा केला. त्या बरोबर हरिसिंहानें एक चांदीचा कटोरा त्या मुलीचे डोक्याखालीं ठेविला व माझा बाप खंजीर उपसून तिला मारण्यास तयार झाला; पण काय झालें कोण जाणें ? त्याच्या हातून तो खंजीर निसटून खालीं पडला. त्याबरोबर राजा क्रोधानें लाल होऊन त्याच्या अंगावर धांवला व तरवार उपसून ह्मणाला:— " कायरे हरामखोर, माझा हुकूम तूं ऐकत नाहींस ? चल, तयार हो व या कारटीचें ह्या कटोराभर रक्त मजजवळ दे, ह्मणजे तें मी सुंदरीला पाजीन. "

माझ्या बापानें निरुपाय होऊन पुन्हां खंजीर हातांत घेतला व त्याचा असा एक जोराचा रट्टा त्यानें त्या बिचाऱ्या रडत असलेल्या मुलीच्या डोक्यावर मारला कीं, त्याबरोबर तिच्या डोक्यांतून भळभळ रक्त वाहूं लागलें. हा भयंकर प्रकार पाहून सुंदरी बेशुद्ध झाली व मीही चक्कर येऊन तेथें जमिनीवर पडलें. एक तासानें मी सावध झालें व त्या झरोक्यांतून पाहूं लागलें, तों मला तिसराच प्रकार दृष्टिस पडला. त्या दिवाणखान्यांत सुंदरीही नव्हती अथवा ती टांगलेली पोरही नव्हती. त्या बदला तेथें दोन प्रेतें पडलीं होतीं. व राजा तेथें आपल्या सांथीदारांसह कांहीं सांगत होता. राजा माझ्या बापास ह्मणाला:— " या हरामखोर दासी घुमटावरील झरोक्यांतून आपल्या जिवाची भीति न धरितां पहात होत्या. (हरिसिंहास) हरिसिंह, या दासींचीं प्रेत अशा दूर ठिकाणीं नेऊन गाडून टाका कीं, शेंकडों वर्षांनींसुद्धां आपल्या या कृत्याची बातमी फुटणार नाहीं. (माझ्या बापाकडे पाहून) तूं तारेला सोडलीस, हें अतिशय वाईट कृत्य केलेंस. ती आतां पळून गेली असेल; तरी आतां तुला सांगतों कीं, जर तारेचें शीर तूं माझ्यापुढें आणून हजर केलें नाहींस तर तुझाही मी प्राण घेईन. शिवाय, हें कृत्य इतकें गुपचुप झालें पाहिजे कीं, तारा कोठें गेली व तिची हवाल

काय आहे, हें कोणासही कळतां उपयोगीं नाहीं. हा प्रकार ती वीरसिंहासही सांगेल, सबब कसोशी करून लवकरच मीं वीरसिंहासही परलोकीं पाठविण्याचा बेत केला आहे. " हें ऐकल्याबरोबर माझ्या शरीरास दरदरून घाम सुटला व तिकडे ही गोष्ट कळविण्याकरितां मीं तावडतोब एका दासीला बरोबर घेऊन तशा रात्रीं घरचा रस्ता सुधारला.

तारेच्या तोंडून ही हकीकत ऐकून साधू महाराजांना अतिशय वाईट वाटलें व ते क्षणभर डोळे मिटून स्वस्थ बसले. अखेर ते तारेस ह्मणालेः— " हा राजा मोठा दुष्ट व दगलबाज आहे. ईश्वर त्याच्या कर्माचीं फळें त्यास लवकरच भोगावयास लावील. "

प्रकरण १२ वें.

खड्गसिंह वीरसिंहाचा शोध करण्याकरितां नाहरसिंह व इतर लोकांसह निघाला असतां वाटेंत त्यास एक प्रेत आढळलें, इतकी हकीकत मागें सांगितलीच आहे. मशालीच्या उजेडानें त्यांनीं तें प्रेत न्याहाळून पहातां तें कोणा राजाच्या शिपायाचें असावें, असें त्यांनीं ताडलें. तेव्हां नाहरसिंह ह्मणालाः—" येथें राजाच्या लोकांचा वीरसिंहाशीं झगडा झाला, असें मला खास वाटतें. "

खड्ग०— होय. मलाही तसेंच वाटतें आणि वीरसिंहास राजाच्या लोकांनीं कैद करून नेलें असावें, अशी माझी कल्पना होते.

नाहर०— आपण जर आतांच्या आतां राजाकडे गेलों, तर वीरसिंहाचा आपणांस खचित् शोध लागेल.

खड्ग०— मी तर आतां करणसिंहाकडे जाणारच, तुह्मीही येणार काय ?

नाहर०—मला येण्यास काय हरकत आहे? आपल्यासारिखा शूर सांथीदार मजबरोबर असल्यावर मी कोणालाही भीत नाहीं. शिवाय, मला तेथें ओळखणारा तरी कोण आहे?

खड्ग०— तुह्मी तेथें येण्यास भिणार नाहीं, हें मी जाणतों. तथापि तुह्मी तेथें न यावें, हेंच मला बरें दिसतें. कारण तेथें काय प्रकार घडेल कोण जाणें? आपण येथेंच कोठें तरी असा; वीरसिंह तेथें असल्यास मी त्यांस खचित् घेऊन येतों. (कांहीं विचार करून) पण तुह्मी येथें एकटे राहणेंही मला धोक्याचेंच वाटतें.

नाहर०— त्याबद्दल आपण बेफिकीर रहा. मी येथें एकटा नसून माझे सांथीदार आसपास आहेत, हें आपण समजा.

खड्ग०— तर मग या लोकांना मी बरोबर घेऊन जातों.

खड्गसिंह इतर लोकांस बरोबर घेऊन राजवाड्याकडे निघाला. दरवाजावर पोंचल्याबरोबर पहारेवाल्यांनीं त्यास मज्जाव केलें; पण, खड्गसिंह त्यांना न जुमानतां एकदम पुढें निघून गेला. शिवाय, तो नेपाळचा सेनापति आहे, असें समजून शिपायांनींही मग विशेषशी हुज्जत घेतली नाहीं.

खड्गसिंह जो तडक निघाला, तो थेट दिवाणखान्यांत जाऊन पोंचला; तेव्हां राजा, शंभुदत्त व सरूपसिंह, याशीं बोलत बसला होता व चार असामींनीं आणलेलें तें प्रेत तेथें नुकतेंच येऊन पोंचलें होतें. सदर प्रेत वीरसिंहाचें होतें व तें राजाचे समोर ठेविलें होतें. वीरसिंह मेला नसून त्यास जखमा लागल्यामुळें तो फक्त बेशुद्ध झाला होता, असें त्याच्या श्वासोश्वासावरून दिसून येत होतें.

एकाएकीं खड्गसिंह तेथें आल्याचें पाहून राजाला फार आश्चर्य वाटलें व थोडासा तो भ्यालाही; पण त्यानें तें न दाखवितां खडीताजीम दिली व त्यांस आपल्या गादीवर घेतलें व तो लागलींच ह्मणालाः— " ज्या सैतान नाहरसिंहानें या माझ्या पुत्राचा खून

करणाऱ्या वीरसिंहास पळवून नेलें होतें, त्यास हा पहा मोठ्या शर्तीनें पकडून आणला. "

खड्ग०— ही गोष्ट फारच छान झाली. मीं यासंबंधीं पुष्कळ चौकशी केली व माझी खात्री झाली कीं, वीरसिंह हा मोठा दुष्ट व निमकहराम आहे. मी आपल्या हातानें याचें डोकें उडविणार !! हां, बरी आठवण झाली, आपणास एक नवी आणि अत्यंत आनंदाची अशी एक बातमी सांगावयाची आहे.

राजा०— ती काय बरें !!

खड्ग०— आपला शत्रू जो नाहरसिंह त्यासही मीं नुकतेंच पकडलें आहे.

राजा०— वाहवा ! ! वाहवा ! ! ही गोष्ट फारच उत्तम झाली, खरोखर आपले हे माझ्यावर जन्माचे उपकार आहेत. सध्यां तो कोठें आहे ?

खड्ग०— शिपायांबरोबर आतांच मीं त्यास कैद करून आपल्या लष्करांत पाठविलें आहे. वीरसिंहासही तुह्मी शिपायांबरोबर माझ्या लष्करांत पाठवून द्या; ह्मणजे उद्यींक सर्व रयतेचा एक दरबार करून तेथें या दोघांना कांहीं एक चौकशी न करितां फांशी देण्याचा विचार आहे व नेपाळच्या महाराजांकडून आलेली पदवीही त्याच दरबारांत आपणांस देण्याचें मीं ठरविलें आहे. शिवाय आपले आणखी कांहीं शत्रू आहेत, त्यांनाही उद्यांचे उद्यांच फांशी देऊन टाकूं.

राजा०— मला आणखी कांहीं शत्रू आहेत, हें आपणांस कसें समजलें ?

खड्ग०— नेपाळच्या महाराजांनीं जेव्हां मला इकडे जाण्याबद्दल हुकूम दिला; तेव्हां मला सक्त ताकीद दिली कीं, ' करणसिंहास लागेल ती मदत द्यावी व त्याच्या शत्रूंना हुडकून काढून ठार

मारावें. हरिपुरची प्रजा फार बेइमान आहे; सबब तीस चिडविण्या-करितां त्यास राजाधिराज पदवी द्यावी.' या हुकुमाप्रमाणें मी येथें येऊन पोंचलों; तेव्हां माझ्या समजण्यांत आलें कीं, येथील कांहीं जमीदार लोकांनीं आपल्याविरुद्ध कट केला आहे. मोठ्या शिताफीनें मीही त्या कटांत सामील झालों; तेव्हां आतां आपले शत्रू कोण आहेत, हें मला कळणें काय कठीण आहे ?

राजा०—(हंसून) खरोखर ही आपली माझ्यावर मोठीच मेहेरबानी झाली असें समजलें पाहिजे. बरें, त्या कटांत कोण आहेत, हें आपण मला सांगाल काय ?

खड्ग०—या वेळीं त्यांचीं नांवें मी सांगत बसत नाहीं. उद्यां दरबारामध्यें त्यांना फांशीचे हुकूम दिले, ह्मणजे आपोआपच त्यांचीं नांवें आपणांस समजतील.

खड्गसिंह एकाएकीं दिवाणखान्यांत आल्यामुळें राजा फारच घाबरून गेला होता; तथापि, त्यानें आपण घाबरलों किंवा भ्यालों आहों, असें बिलकुल दाखविलें नाहीं. त्याच्या मनांत एकदम आलें कीं, खड्गसिंहास ठार मारून टाकावें, ह्मणजे सर्वच काम उरकलें व आपलें काम सिद्धीस नेण्यास ही संधीही मोठी उत्तम जुळून आली आहे. या वेळेस जर खड्गसिंहास मारलें तर कोणासही कळण्याचा संभव नाहीं.

इकडे खड्गसिंहाच्या मनांतही तीच गोष्ट आली. आपण केवळ तीनच लोक बरोबर आणले, ही मोठी चूक झाली, असें त्याला वाटलें. राजाविरुद्ध झालेल्या कटांत राजपक्षाचा एक इसम सामील आहे, असें नुकतेच मला समजलें असूनही यावेळीं जास्त माणसें बरोबर मी आणलीं नाहींत हें आपण बरें केलें नाहीं. कारण, राजानें यावेळींच जर कांहीं दगा करण्याचें मनांत आणलें, तर स्वसंरक्षणाची मोठी पंचाईत पडणार आहे. कटांतील त्या फितुरी

मनुष्यानें सर्व हकीकत रामाला सांगितली असेल व ह्मणून या राक्षसी राजाच्या मनांत दगा करण्याचें येणार नाहीं, असें नाहीं. इत्यादि गोष्टी त्याच्या मनांत येऊन खड्गसिंहानें मोठ्या चातुर्यानें आपले बोलण्याचा रोंख एकदम बदलला व मोठमोठ्या मिठ्या मिठ्या बाता सांगून राजाला त्यानें अगदीं मोह पाडून टाकिला. तेव्हां राजालाही वाटलें कीं, खड्गसिंह आपला मदतगार आहे, तरी त्याच्याशीं आपण कपट करूं नये. असें मनांत आणून त्यानें आपले शिपायांस वीरसिंहास खड्गसिंहाच्या गोटांत नेऊन पोंचविण्याचा हुकूम दिला. खड्गसिंहही राजाची परवानगी घेऊन लागलींच निघाला. सडकेवर आल्यावर त्यानें बरोबर आणलेल्या तीन सरदारांपैकीं दोघांस सांगितलें कीं, तुह्मी वीरसिंहाबरोबर जा व त्याच्या जखमांस मलमपट्टी लावून त्याची उत्तम शुश्रुषा ठेवण्याची तजवीज करा. असें सांगून खड्गसिंह एक सरदारास बरोबर घेऊन नाहरसिंहास जेथें सोडलें होतें तिकडे निघाला. ज्या वाड्यांत हरीपूरच्या सभ्य गृहस्थांची राजाविरुद्ध कट करण्याकरितां सभा भरली होती, त्या वाड्याच्या अलीकडेच खड्गसिंहास नाहरसिंह भेटला. यावेळीं नाहरसिंह एकटा नसून त्याज-बरोबर आणखी पांच असामी होते. त्यांना पाहून खड्गसिंहानें विचारिलें:— " कोण आहे ? नाहरसिंह. " नाहरसिंहानें जबाब दिला, " होय, मीच. "

खड्ग॰— हे सर्व कोण आहेत?

नाहर॰— हे माझेच सांथीदार आहेत.

खड्ग॰— इतकेच आहेत कीं आणखी कांहीं आहेत ?

नाहर॰— आणखीही आहेत. प्रसंग पडला तर अर्ध्या घटकेचे आंत येथें माझे शंभर बहादर जमतील.

खड्ग॰— ठीक आहे.

नाहर॰— बरें, वीरसिंहाचा शोध लागला ?

खड्ग०— होय, करणसिंहाच्या लोकांनीं त्यास जखमी करून राजवाड्यांत नेलें नाहीं तोंच मी जाऊन पोंचलों ! व त्यास माझ्या लोकांबरोबर लष्करांत पाठवून दिलें.

नाहर०— वीरसिंहाची स्थिति कशी काय आहे ?

खड्ग०— त्याच्यासंबंधानें तुह्मी अगदीं निष्काळजी असा. त्याला कांहीं जखमा लागल्या आहेत, पण माझ्या लोकांनीं त्यांस मलपट्टी लाविली असेल. आतां उशीर नको, चला तिकडे; ते लोक आपली वाट पहात बसले असतील.

नाहर०— चला. आपण गेल्याशिवाय त्यांची काळजी दूर होणार नाहीं.

खड्गसिंह, नाहरसिंह व त्याचे सांथीदार यांसह जेथें हरीपूरचे बडे लोक एकत्र जमले होते, त्या वाड्यांत पुन्हां जाऊन पोंचला. खड्गसिंह आल्याबरोबर सर्व लोक उठून उभे राहिले. खड्गसिंह आपल्या जागेवर बसला, त्यानें नाहरसिंहास आपले शेजारीं बसवून घेतलें व सर्वांस बसण्यास सांगितलें. नाहरसिंहानें आपले सांथीदारांपैकीं एका बुरखा घेतलेल्या मनुष्यास आपल्या मागें बसविलें. नंतर अनिरुद्धसिंह ह्मणाला:— "वीरसिंहाचा पत्ता लागला काय ?"

खड्ग०— होय. राजाच्या दगलबाज लोकांनीं त्यास पकडून राजवाड्यांत नेलें होतें. मीं तेथें जाऊन त्यास सोडविलें व आपले लष्करांत पाठवून दिलें. बचनसिंह व हरिहरसिंह यांसही मोठ्या बंदोबस्तानें आतांच्या आतां लष्करांत पाठविण्याची तजवीज झाली पाहिजे.

लागलींच त्या उभयतांच्या मुसक्या बांधून त्यांस शिपायांचे पहाऱ्यांत खड्गसिंहाच्या छावणींत रवाना करण्यांत आलें. नंतर नाहरसिंहाकडे पाहून खड्गसिंह ह्मणाला:— "राजपुत्र जिवंत आहे, असें तुमचें ह्मणणें असल्यास तुह्मी त्यास आह्मांला दाखवूं शकाल काय ?"

नाहर०—होय, मी दाखवूं शकेन, तो जिवंत आहे, अशाबद्दल आतांही एक पुरावा मजजवळ आहे.

खड०—तो कोणता ?

नाहरसिंहानें एक पत्र आपले खिशांतील काढलें व तें खड्गसिंहाच्या हातीं देऊन त्यास वाचण्यास सांगितलें. हें पत्र नाहरसिंहानें जें रामदासाजवळून नदीचे कांठीं हिसकावून घेतलें होतें तेंच होय. तें पत्र वाचून खड्गसिंहाच्या अंगाचा संताप झाला व तो ह्मणालाः—" पत्र राजाच्या हातचें आहे व त्याचा शिक्काही याजवर आहे. याशिवाय अन्य पुराव्याची आह्मांला जरूर नाहीं व राजपुत्रास प्रत्यक्ष पहाण्याचीही आमची इच्छा नाहीं. (अनिरुद्धसिंहाजवळ पत्र देऊन) हें घ्या, वाचा; व सर्वांना वाचण्यास द्या ! " सर्वांनीं तें पत्र वाचलें व वीरसिंह निर्दोषी असल्याबद्दल त्यांनी आपलें मत दिलें.

अनिरुद्ध०—(खड्गसिंहास) सेनापतिसाहेब, आह्मी नेपाळच्या महाराजांकडे जे तक्रारी अर्ज पाठविले, ते खरे आहेत, याबद्दल आतां आपली खात्री झाली असेलच.

खड्ग०— निःसंशय. बरें, नाहरसिंहजी, आपण ह्मणाला होता कीं, वीरसिंहाची खरी हकीकत आपणाला ठाऊक नाहीं ह्मणून !! ती आपण आह्मांला आतां सांगूं शकाल काय ?

नाहर०—आपण ऐकण्यास तयार असाल तर ती मी सांगतों.

खड्ग०— आह्मी ऐकण्यास तयार आहों. सांगा !!

नाहरसिंहानें वीरसिंहास सांगितलेली करणसिंह व करणसिंह-दिवाणजी यांची हकीकत यावेळीं खड्गसिंहास व जमलेल्या सरदारांस सांगितली. व त्यानंतर वीरसिंहाच्या सुटकेची हकीकत आणि तारानें साधू महाराजांस सांगितलेली अहिल्या ऊर्फ सुंदरीची हकीकत हीही सांगितली. सुंदरीची कांहीं हकीकत नाहरसिंहास ठाऊक

होती व बाकी हकीकत वीरसिंहानें तारेकडून कळलेली नाहरसिंहास सांगितली होती. वीरसिंहास अहिल्या आपली बहीण आहे हें मुळींच ठाऊक नव्हतें, तें त्यास नाहरसिंहाची भेट झाल्यावर कळलें.

नाहरसिंहाच्या तोंडून ही खरी हकीकत ऐकून सर्वांच्या अंगाचा संताप झाला व ते सर्व राजा बनलेल्या करणसिंहास शिव्या देऊं लागले. कांहीं वेळपर्यंत सर्वांच्या तोंडावर उदासीनता दिसूं लागली; पण लागलींच सर्वांनीं मोठ्या क्रोधानें सांगितलें कीं, "असल्या बेइमान व दुष्ट राजाच्या अमलाखालीं आह्मी राहणार नाहीं. आह्मी आपल्या हातानें राजास शिक्षा देऊन खरा राजा करणसिंह यांच्या मुलास ह्मणजे नाहरसिंहास ऊर्फ बिजयसिंहास गादीवर बसविणार ! आह्मी फंड जमा करून सैन्य जमवूं; व बिजयसिंह आणि वीरसिंह यांस सैनाधिपत्य देऊन या राजाबरोबर लढाई देऊं; पण मुकाट्यानें या जुलमी राज्यांत राहणार नाहीं." अशा तऱ्हेनें निकराचीं भाषणें जमलेल्या लोकांनीं केलीं; व खड्गसिंहानेंही आपले फौजेसहीत त्यांस मदत करण्याचें कबूल केलें.

नाहर०— माझी बहीण सुंदरी इची थोडीशी हकीकत सांगण्याची राहिली आहे, ती आपली इच्छा असेल तर हे माझ्या मागें बसलेले गृहस्थ आपणास सांगतील.

लोक०— हो, हो, आह्मी ती हकीकत ऐकण्यास तयार आहों. हे कोण आहेत ?

नाहर०— हे आपली सर्वच हवाल आपणांस सांगतील.

खड्ग०— यांनीं आपल्या तोंडावरील आच्छादन काढण्यास येथें कांहीं हरकत नाहीं.

नाहरसिंहाच्या मागें बसलेले गृहस्थ बाबूसाहेब होते. पोटाशीं मूल धरून किल्ल्याच्या तळघरांत सुंदरीला भेटण्याकरितां जे गृहस्थ गेले होते व ज्यांनीं तेथें हरिसिंहास ठार मारलें, तेंच हे गृहस्थ होत.

खड्गसिंहानें सांगितल्याबरोबर बाबूसाहेबांनीं आपले तोंडावरील बुरखा काढला व ते सुंदरीची, जी कोणास ठाऊक नव्हती, अशी हकीकत सांगूं लागले. ते ह्मणाले:— "सुंदरी अहिल्या या नांवानें या दुष्ट राजाच्या घरीं पुष्कळ दिवस होती. राजाची तिजवर पापदृष्टी आहे, हें जेव्हां राणीच्या लक्षांत आलें, तेव्हां तिनें गुप्त रीतीनें तिची आपले माहेरीं रवानगी केली व बापास तिचें लग्न करून टाकण्याबद्दल निरोप पाठविला. सुंदरीचें लग्न माझेबरोबर झालें व आह्मांस एक मुलगी व एक मुलगा ईशकृपेनें झाला. त्या वेळेपर्यंत राजाला सुंदरीचा शोध लागला नाहीं. परंतु, अखेर तिचा शोध त्या दुष्टास लागून त्यानें तीस माझ्या घरांतून जबरीनें नेलें. त्यानें तीस कसें छळलें, हें आपणांस विजयसिंहजींनीं सांगितलेंच आहे. बिचाऱ्या मुलीचा त्यानें ज्या भयंकर रीतीनें प्राण घेतला, त्याची आठवण झाली कीं, काळीज थरारून जातें. सुंदरीनें वश व्हावें ह्मणून राजानें जंग जंग पछाडले; परंतु, तिनें आपला धर्म सोडला नाहीं. अखेर राजानें तीस किल्लयाच्या तळघरांत कोंडून ठेविलें व तिच्या मुलीचें रक्त एका कटोऱ्यांत भरून तिच्या समोर ठेविलें आहे. तें रक्त पाहून सुंदरी रात्रंदिवस झुरत आहे. त्या सुंदरीचे सध्यां काय हाल होत आहेत व त्या कटोऱ्यांतील रक्ताकडे पाहून तिची वारंवार काय स्थिति होत असेल, याची कल्पना आपणच करा; परंतु, महाराज, इतके हाल होत असूनही त्या सुंदरीनें आपल्या प्यार धर्मास सोडण्याचें मनांतही आणलें नाहीं."

बाबूसाहेबांच्या तोंडून इतकी हकीकत ऐकिल्यावर जमलेल्या सर्व लोकांनीं सुंदरीच्या पातिव्रत्याबद्दल फारच तारीफ केली. "शाबास, सुंदरी शाबास; तुझ्यासारखी स्वधर्मरत राहणारी दुसरी स्त्री या जगावर क्वचितच सांपडेल" असे उद्गार एकदम त्यांच्या तोंडून निघाले. नंतर बाबूसाहेब पुढें सांगूं लागले:—"सुंदरीला तळ-

घरांत ठेवल्यावर तिचें मन वळविण्याकरितां कांहीं दासी तिच्या तैनातीस ठेवण्यांत आल्या होत्या. त्यांपैकीं एकीस तिची दया येऊन तिनें संधि साधून सुंदरीचा एक निरोप मजला येऊन कळविला कीं, कसें तरी करून मुलाला घेऊन एकदां मला येऊन भेटा. सुंदरीचा निरोप ऐकून माझें काळीज फाटून गेलें. मी या शहरांत येऊन तिची भेट घेण्याची खटपट करूं लागलों. सतत एक वर्षपर्यंत प्रयत्न केला; लाचलुचापति देण्यांत माझे हजारों रुपये फडशा पडले, तेव्हां कांहींचें मला साह्य मिळालें व दोनचार दिवसांपूर्वीच त्यांचे साह्यानें मीं तळघरांत जाऊन मुलासह तिची भेट घेतली. महाराज, तिची तथील अवस्था किती हृदयद्रावक आहे, तें सांगतां येत नाहीं. नाहरसिंहानें वीरसिंहास त्याच दिवशीं सोडविलें, हें मला त्याच वेळीं कळलें होतें व ती गोष्ट कांहीं पहारेवाल्यांसही कळली होती; परंतु, त्यांचें मन राजाविषयीं चांगलें नसल्यामुळें नाहरसिंहाचें कृत्य बिनबोभाट तडीस गेलें.

वीरसिंह आपला भाऊ आहे, ही गोष्ट सुंदरीस ठाऊक होती; पण राजाचे भयानें ती ती गोष्ट कोणाजवळ बोलली नाहीं. वीरसिंहास कैद केल्याचें ऐकून सुंदरी अत्यंत दुःखी झाली; पण माझ्या तोंडून त्याची सुटका झाल्याचें ऐकून तिला बरें वाटलें. मी सुंदरीशीं गोष्टी बोलत तेथें बसलों असतां, राजाचा कारभारी हरीसिंह तेथें येऊन पोंचला, तेव्हां सुंदरीनें माझ्या व आपल्या जिवाची आशा सोडली; पण मीं त्याच्याशीं लढाई करून त्यास ठार मारलें व त्याचें प्रेत घेऊन किल्ल्याबाहेर पडलों, तों नाहरसिंहाचे लोकांची व माझी अकस्मात् गांठ पडली. नाहरसिंह व वीरसिंहाची गांठ पडावी, अशी माझी फार इच्छा होती व त्या लोकांनीं मला त्यांजकडे आपलेबरोबर नेण्याचें कबूलही केलें. अखेर हरीसिंहाचें प्रेत पुरून टाकलें आणि मुलासह आम्ही नाहरसिंहाच्या भेटीस निघालों. वाटेंत

आह्मांला राजाच्या स्वारांनीं गाठलें; पण तेथेंच असलेल्या एका लहानशा पुलाच्या कमानीखालीं दडल्यामुळें सुदैवानें आह्मी त्यांच्या हातीं लागलों नाहीं. बऱ्याच वेळानें आह्मी तेथून निघालों व नाहरसिंहाकडे निघून गेलों.

खड्ग०— तो मुलगा सध्यां कोठें आहे ?

बाबू०—(नाहरसिंहाकडे पाहून) यांच्या स्वाधीन त्यास केलें आहे.

खड्ग०— तुह्मां लोकांची हकीकत मोठी कींव येण्यासारखी आहे. खरोखर ती ऐकून माझें काळीज थरारून जातें. पण, बिचाऱ्या तारेची हवाल काय आहे, हें कांहींच कळत नाहीं.

नाहर०— तारेची हवाल मला सर्व ठाऊक आहे; पण, अद्याप ती मीं वीरसिंहास सांगितली नाहीं.

खड्ग०— पण या वेळीं ती सांगण्यास कांहीं हरकत आहे काय?

नाहर०— कांहीं हरकत दिसत नाहीं.

खड्ग०— मग सांगा तर !!

नाहर०— आतांपर्यंत आपण जी हकीकत ऐकिली, त्यावरून हें आपल्या लक्षांत येऊन चुकलेंच असेल कीं, राजानें तारेच्या बापासच तिचा खून करून शीर आणून दाखविण्याबद्दल ताकीद केली होती.

खड्ग०— होय, तारेच्या बापानें राजवाड्याच्या घुमटाचे झरोक्यांतून पहाणाऱ्या दासीस पकडून आणलें व तारेस सोडून दिलें ह्मणूनच राजानें त्यास तसा हुकूम दिला होता नव्हे काय ?

नाहर०— बरोबर आहे. पण तारा जर राजावर फिदा होण्यास तयार असेल तर मात्र तिजला सोडून द्यावें, असा सुजनसिंहास राजाचा हुकूम होता. तारेस वश करण्याकरितां राजानें हरीसिंहाची योजना केली होती; पण तिनें ती गोष्ट साफ नाकारिली. पुढें वीरसिंहाच्या बागेंत जेव्हां सुजनसिंह आपल्या मुलीचा खुन कर-

ण्यास तयार झाला, तेव्हां मी तेथें हजर होतों व त्यावेळीं एक साधुमहाराजही तेथें होते. त्यांच्या मदतीनें आह्मी तारेस सोडविलें. सध्यां तारा त्यांचेजवळच आहे.

खड्ग०— आपण एका भटक्या साधूच्या स्वाधीन तारेला कशी केलीत? त्याचा काय भरंवसा आहे? तो कांहीं तरी भलतेंच करील!!

नाहर०— त्या साधूची मला खात्री आहे. तो मोठा महात्मा पुरुष आहे. त्यांची पूर्व पिठिका मला ठाऊक नाहीं; पण, ते साधू निरुपद्रवी व प्रेमळ असून लांब एका जंगलांत रहातात. त्यांचें माझ्यावर फार प्रेम आहे व माझीही त्यांच्यावर दृढ भक्ति आहे. माझी ही सर्व हकीकत त्यांना ठाऊक आहे व त्यांच्याच सल्लयानें मी सर्व कामें करितों. त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था मीच करीत असतों.

खड्ग०— माझी त्यांची भेट होईल काय?

नाहर०— बहुतकरून ही गोष्ट ते नामंजूर करतील, असें मला वाटतें. (बाहेर चौकाकडे पाहून) ओहो!! अगदीं पहाट झाली. आतां माझें गांवांत राहणें श्रेयस्कर नाहीं.

खड्ग०— आमचे येथेंच तुह्मी राहिल्यास कांहीं हरकत नाहीं.

नाहर०— आपण ह्मणतां ती गोष्ट खरी. पण, मी येथें सध्यां राहिल्यानें कांहीं फायदा आहे असें नाहीं. वीरसिंहास तुमच्या स्वाधीन केलाच आहे. फक्त बाबूसाहेबांस मी घेऊन जातां. जेथें ज्यावेळीं येण्यास सांगाल, त्यावेळीं तेथें मी हजर आहेच असें समजा.

खड्ग०— बरें; पण आणखी एक गोष्ट आपणास सांगावयाची आहे!

नाहर०— ती कोणती?

खड्ग०— जेव्हां वीरसिंहास सोडविण्याकरितां मी राजवाड्यांत गेलों, तेव्हां मी समयानुसार राजाला सांगितलें कीं, उद्यां एक

दरबार करून तेथें वीरसिंहास व इतर शत्रूंस फांशी देण्याचा हुकूम देऊं; व तेथेंच नेपाळच्या महराजांनीं आपणास दिलेली " राजाधिराज " पदवीही अर्पण करूं. तर आतां यासंबंधानें आपला अभिप्राय काय आहे ?

नाहर०— ही गोष्ट तर फारच चांगली आहे. या दरबारांत गोठीच मजा होईल. रामानीं कारस्थानें सर्व बाहेर येतील व कदाचित् लढाई देण्याचाही प्रसंग येईल. तर माझ्या मतें हा दिवस टाळावा, आपल्या सैन्याची उद्यांचे दिवसांत चांगली तयारी करावी' व मीही आपल्या लोकांसहीत सज्ज होतों; तरी उद्यांचा तेवढा दिवस टाळून पुढें एखादा दिवस मुक्रर करावा.

खड्ग०— (इतर लोकांकडे पाहून) आपलें मत काय आहे ?

लोक०— नाहरसिंहानें म्हणणें आह्मांला बरें दिसतें. आह्मांलाही लढाईची तयारी करूनच दरबारास आलें पाहिजे; तरी तयारीकरितां उद्यांचा दिवस टळेल तर उत्तम.

खड्ग०— बरें तर तसेंच ठरवूं.

येणेंप्रमाणें विचार ठरून ती सभा बरखास्त झाली. नाहरसिंह बाबूसाहेबास घेऊन आपल्या राहण्याचे ठिकाणीं गेला; लोकही घरोघर गेले; खड्गसिंहही आपले डेऱ्यास जाऊन त्यानें सर्व हकीकत वीरसिंहास कळविली व त्याच्या औषधपाण्याची योग्य तजवीज केली.

प्रकरण तेरावें.

खड्गसिंह वीरसिंहाला सोडवून जेव्हां राजवाड्यांतून बाहेर पडला, तेव्हां राजाच्या कारभाऱ्यांपैकीं सरूपसिंह हा त्याच्या पाठोपाठ गुप्त रीतीनें निघाला; व जेथें खड्गसिंहानें नाहरसिंहाला हाक मारिली, तेथपर्यंत गेला. खड्गसिंहानें नाहरसिंहास

हाक मारल्याबरोबर सरूपसिंह थबकला व त्याचें मनांत एकदम आलें कीं, खड्गसिंहानें राजाला आपण तुझे मित्र आहों म्हणून सांगितलें तें खोटें असून तो राजाचा शत्रू व नाहरसिंहाचा मित्र आहे खास. नाहरसिंहाला पाहून सरूपसिंह सपाट्यानें निघाला व राजापुढें येऊन उभा राहिला. तेव्हां राजानें त्यास विचारिलें:—“ कां असा दमल्यासारखा कां दिसत आहेस ? कांहीं बातमी आणली आहे कीं काय ? तूं गेला होतास कोठें ?

सरूप०— खड्गसिंहाच्या मागोमाग गेलों होतों !

राजा०— कशाला ?

सरूप०— तो जातो कोठें व त्यानें येथें जी साखर पेरली, ती खरी कीं खोटी हें प्रत्यक्ष अजमावण्याला.

राजा०— मग काय अजमावलेंस ?

सरूप०—तो मोठा बईमान आहे. त्यानें आपणास पुरें खड्यांत घातलें. नाहरसिंहाला कैद केल्याचें वर्तमान सर्वस्वी खोटें आहे, इतकेंच नव्हे, पण त्या उभयतांचा स्नेह जमला आहे. आपल्याविरुद्ध ज्या वाड्यांत कट चालला आहे, त्याच वाड्याच्या अलीकडे त्या उभयतांची गांठ पडली व ते दोघेही त्या वाड्यांत शिरलेले मीं प्रत्यक्ष पाहिलें.

राजा०— तो नाहरसिंहच आहे, हें तुला कशावरून समजलें ?

सरूप०— खड्गसिंहानें त्यास “नाहरसिंह” म्हणून हाक मारिली त्यावरून !

राजा०— खड्गसिंहानें बीरसिंहालाही त्या वाड्यांतच नेलें काय ?

सरूप०— नाहीं. बीरसिंहास लष्करांत पाठवून खड्गसिंह मात्र त्या वाड्याकडे गेला.

राजा०— मग तर त्यानें मला चांगलेंच फसविलें !!

सरूप०— यांत काय संशय !!

राजा०— तो येथें आला होता, तेव्हांच त्याला छाटून टाकलें असतें तर फार बरें होतें !!

सरूप०— यावेळेस जर शंभर लोक मजबरोबर द्याल, तर खड्गसिंह व नाहरसिंह या दोघांसही त्या वाड्यांतून आतांचे आतां कैद करून आणतों.

राजाः— छे ! छे !! रयतेच्या मनांत आपल्यासंबंधानें जो थोडा विश्वास आहे, तोही या कृत्यानें जाईल; व आतांच शहरांत बंडावा माजेल; तरी तें करण्याची ही वेळ नव्हे. प्रथमतः आपण आपली पक्की मजबुती करून ठेविली पाहिजे. तूं मला न विचारितां गुपचुप रीतीनें खड्गसिंहाच्या पाठीमागें गेला होतास; पण, मी शंभूदत्ता-लाही त्याच्या मागोमाग पाठविला आहे. पहावें, तो काय खबर आणितो ती. तो आल्यावर मग कायतो नक्की बेत करावयाचा. शिव ! शिव !! मी मोठ्या संकटांत तूर्त पडलों आहें !!

अशा तऱ्हेनें या दोघांचें बोलणें चाललें असतां शंभूदत्तही सरू-पसिंहाप्रमाणेंच धापा टाकीत व भीत भीत तेथें येऊन पोंचला; तेव्हां राजा त्यास ह्मणालाः— "काय बातमी आणिलीस ?"

शंभू०— खबर कसली विचारतां ! नजरबंदीचा खेळ चालला आहे. खड्गसिंहानें आपणास पुरें फसविलें ? बीरसिंहास आपल्या लोकांबरोबर आपल्या लष्करांत पाठवून खड्गसिंह महाराजांविरुद्ध ज्या वाड्यांत कट चालला आहे, त्या वाड्यांत गेला. नाहरसिंह त्यास वाटेंत भेटला, त्यासही त्यानें आपल्याबरोबर नेलें.

राजा०— इतकी हकीकत तर सरूपसिंहाकडूनच मला समजली आहे. तूं जास्त बातमी काय आणली आहेस ?

शंभू०— ही बातमी सरूपसिंहाला कशी समजली ?

राजा०— मला न कळवितां सरूपसिंह खड्गसिंहाच्या मागो-माग गेला होता.

शंभू०— मला आणखी एक बातमी लागली आहे.

राजा०— ती काय ?

शंभू०— बच्चनसिंह कैद झाला असून हरिहरसिंहाच्याही हातांत बिड्या पडल्या आहेत.

राजा०— (घाबरून) काय? असें झालें !!

शंभू०— होय सरकार !!

राजा०— हें एवढें मोठें धाडस कोणीं केलें ?

शंभू०— खड्गसिंहाशिवाय दुसरा कोण करणार ?

राजा०— सध्यां ते दोघेजण कोठें आहेत ?

शंभू०— त्यांस मोठ्या बंदोबस्तानें खड्गसिंहानें आपले छप्क-शांत पाठविलें. मी त्यांच्या मागोमाग तेथपर्यंत गेलों होतों.

राजा०— आतां मात्र कमाल झाली. (विचार करून) तथापि कांहीं फिकीर नाहीं. त्यांचा पुरा समचार मला घेतलाच पाहिजे. बरें, सेनापतीला बोलवा, ताबडतोब बोलवा.

शंभू०— बरें आहे.

राजा०— नको, नको. येण्याजाण्यांतच वेळ जाईल. मी स्वतःच जातों. तुह्मीही उभयतां मजबरोबर चला.

शंभू०— जसा हुकूम.

राजानें पोषाक केला व तो त्या दोघांसह निघाला. देवडीवर पांच स्वारांचा पहारा असे, त्यांचेच घोडे घेऊन हे तिघेजण त्यांवर स्वार झाले व सेनापतीच्या राहण्याचे ठिकाणीं जाण्याकरितां मोठ्या त्वरेनें निघाले व लवकरच सेनापतीच्या वाड्याजवळ जाऊन उभे राहिले. सेनापतीस राजेसाहेब आल्याची वर्दी दिली. अवेळीं कांहीं कारण नसतां स्वतः राजेसाहेब आल्याचें ऐकून सेनापति भीत भीत राजापुढें येऊन हात जोडून उभा राहिला. राजा आपल्या दोन्ही कारभांऱ्या-सह घोड्यांवरून उतरला व सेनापतिसाहेबांच्या वाड्यांत गेला.

एक तासपर्यंत ते लोक त्या वाड्यांत होते. त्यांच्या तेथें काय गोष्टी चालल्या होत्या व काय व्यवस्था त्यांनीं करण्याचें ठरविलें, हें समजलें नाहीं. वाचकांस योग्य वेळीं तें समजून येईलच. एका तासानंतर राजा तेथून निघाला. व आपल्या कारभाऱ्यांसह राजवाड्याकडे निघून गेला. यावेळीं अरुणोदय झाला होता. सर्व रात्रीच्या जागरणानें राजाच्या डोळ्यावर झोंप आली होती. तो पलंगावर जाऊन पडल्याबरोबर त्यास झोंपेनें गांठलें, तों प्रहर दिवस येईपर्यंत तो निजलेलाच होता.

करणसिंह दिवाणजी, पण आतां राजा, जागा झाला. त्यास चैन पडेना, रात्रीं घडलेल्या गोष्टी वारंवार मनांत येऊन त्याचें मन जास्त जास्त उदास होत चाललें. काय करावें, हें त्यास कांहींच सुचेना!! अखेर तो उठला व प्रातर्विधी आटपून व स्नान आणि भोजन करून तो दिवाणखान्यांत येऊन बसला व कारभाऱ्यांस त्यानें बोलावणें पाठविलें. ते आल्यावर त्यानें खड्गसिंहाच्या नांवानें एक पत्र लिहिलें. त्यांतील आशय इतकाच होता कीं, " आपण आज दरबार करणार, ह्मणून बोलला होता, तो केव्हां होणार ? " हें पत्र घेऊन राजानें सरूपसिंहास खड्गसिंहाकडे जाण्यास सांगितलें व त्याप्रमाणें सरूपसिंह आपले कामगिरीवर निघून गेला.

ह्यावेळीं खड्गसिंह आपल्या डेऱ्यांत हरिपूर शहरांतील मोठमोठ्या संभावीत व सरदार लोकांसहीत मसलत करीत बसला होता. इतक्यांत चोपदारानें येऊन वर्दी दिली कीं, राजाचा कारभारी सरूपसिंह भेटण्यास आला आहे. खड्गसिंहानें त्यास आंत घेऊन येण्यास हुकूम दिला. सरूपसिंह आंत आला तों गांवांतील मोठमोठे लोक तेथें बसलेले पाहून अमर्षीं विरघळला. पण करतो काय ? राजाचें पत्र त्यानें खड्गसिंहाच्या हातीं दिलें व तेथें स्वस्थ बसला. खड्गसिंहानें पत्र वाचून पुढीलप्रमाणें जबाब लिहिलाः—

" मला वाटतें, आज दरबार होणें शक्य नाहीं. कारण, त्यासंबंधीं निमंत्रण अद्यापि शहरांत दिलें गेलें नाहीं. सबब आज निमंत्रण करून उद्यीक दरबार करण्याचें ठरवावें, असें माझें मत आहे. दरबार रात्रीं करावा व तो आपल्या थोरल्या बागेंतच करण्याचें ठरवावें. दरबारला या शहरांतील संभावीत व सरदार लोकांनाच बोलवावें. "

" खड्गसिंह. "

पत्राचा जबाब घेऊन सरूपसिंह राजापुढें येऊन हजर झाला, व तेथें पाहिलेल्या गोष्टी राजाला सांगून खड्गसिंहानें उत्तर त्यानें राजाच्या हातीं दिलें. राजा पत्र वाचून कांहीं वेळ स्वस्थ बसला व ह्मणालाः— "खड्गसिंहाच्या हरएक कामांत लबाडी आहे, यांत संशय नाहीं. दरबारचा द्विवस उद्यां कायम केला हें बरेंच आहे; पण वेळ रात्रीची व जागा माझी थोरली बाग याचा उद्देश काय बरें असावा ? "

सरूप०— कोणाच्या मनांत काय असतें, हें कसें समजणार ? पण खड्गसिंहाच्या मनांत कांहीं तरी काळेंबेरें आलेलें आहे, यांत मात्र संशय नाहीं. आपल्यालाही उद्यां बंदोबस्तानेंच तयार असलें पाहिजे.

राजा०— जें काय होतें तें पहातां येईल; तथापि सैन्याची तयारी करण्याबद्दल हुकूम द्यावा, हें चांगलें. आह्मीही शूर आहोंत; एकाएकीं भिणारें नाहीं. आतां बागेच्या आंत फौज जाऊं शकणार नाहीं; तथापि कांहीं हरकत नाहीं. बागेच्या बाहेरच राहील.

सरूप०— त्यानें सिंहासन नेण्याबद्दलही सांगितलें आहे. आपणाला पदवी दिल्यावर त्यावर आपणास बसविलें जाईल, असें त्याचें ह्मणणें आहे.

राजा०— त्या सर्व वस्तू तेथें पाठविणें अवश्य तर आहेच;

कारण उद्यां काय होईल व त्याच्या बाजूनें काय काय प्रकार करण्यांत येतील, हें कांहींच सांगतां येत नाहीं. तथापि त्यानें इतकें पक्कें लक्षांत ठेवावें कीं, करणसिंह लेचापेचा नाहीं व त्याच्या जिवास एकाएकीं धोका देण्याइतका तो कमजोर, भोळा व भित्राही नाहीं. दंड ठोकून तो उभा राहील व आपलेंच काम सिद्धिस नेईल, यांत कधींही अंतर पडणार नाहीं.

प्रकरण चवदावें.

प्रहर रात्र झाली आहे. उद्यां दरबारामध्यें काय करावयाचें, याचा विचार करीत खड्गसिंह आपल्या तंबूंत बसला आहे. हरीपूर शहरांतील १० । २० सरदार त्याच्या दोन्ही बाजूंस बसले असून नाहरसिंह, बीरसिंह व बाबूसाहेबही तेथें बसले होते.

खड्ग०— उद्यां दरबारचे वेळीं राजानें आपलें सैन्य जय्यत तयार ठेविलें व आपले लोक जरी थोडे असले तरी त्याची कांहीं फिकीर मला वाटत नाहीं........

नाहर०— अं:, त्याची काय पर्वा आहे. त्याच्या दोषाचें माप पुराव्यासह त्याच्या पदरांत टाकलें, ह्मणजे त्याची हिंमतच खचून जाईल. दुसरें, प्रसंगानुसार जेव्हां मी आपलें नांव तेथें प्रकट करीन, तेव्हां तर राजा अर्धा मेला झालाच ह्मणून समजा, मग इतरांची कथा काय?

एक सरदार०— आमचा सर्वांचा तर दृढ निश्चय झाला आहे कीं, एक या दुष्ट राजाच्या जुलमी कारकीर्दींतून कायमचे तरी सुटूं अथवा लढाई करून प्राण तरी देऊं.

नाहर०— ईश्वर कृपेनें इतका निकराचा प्रसंग न येतां सर्व यथास्थित होईल, असें मला वाटतें. राजाचा प्राण घेणें ह्मणजे मोठी

कठीण गोष्ट आहे असें नाहीं. मीं मनांत आणलें असतें तर पूर्वीच त्यास यमलोकीं पाठविलें असतें; परंतु, मी आजच्या प्रसंगाची वाट पहात बसलों होतों; व राजाची हरामगिरी लोकांच्यापुढें पुराव्यासह यावी; आणि वाईट कामाचा परिणाम अखेर वाईटच होतो, हेंही लोकांच्या नजरेस यावें, हाच इतके दिवस वाट पहाण्यांत माझा एक हेतू होता.

खड्ग०— [नाहरसिंहास] तुह्मी ह्मणाला कीं, साधू महाराजांनीं आपली मुलाखत करण्याचें कबूल केलें आहे. व ते तास दोन तासांत येतील ह्मणून. मग अद्यापि त्यांची स्वारी कां नाहीं आली बरें !!

नाहर०— आतां येतीलच ते.

इतक्यांत चोपदारानें येऊन साधूमहाराज आल्याची वर्दी दिली. त्याबरोबर खड्गसिंह उठला व सर्वांना उद्देशून ह्मणालाः— "अशा परोपकारी महात्म्याला सर्वांनीं मान दिला पाहिजे." सर्व लोक एकदम उठले व बाहेर जाऊन साधूमहाराजांस ते घेऊन आले व त्यांस उच्चस्थानीं बसविलें.

साधू०— तुह्मी इतकी तसदी कशाला घेतां? मी एक सामान्य बैरागी इतक्या मानास योग्य नाहीं.

खड्ग०— महाराज, आपली हकीकत नाहरसिंहाचे तोंडून आह्मीं ऐकिली आहे व आपल्या योग्यतेबद्दल आमची खात्री झाली आहे.

साधू०— बरें त्या गोष्टी राहूं द्या एकीकडे. आपले उद्यांच्या दरबारची सर्व व्यवस्था झाली कीं नाहीं ?

खड्ग०— सर्व झाली. उद्यां रात्रीं राजाच्या थोरल्या बागेंत दरबार करण्याचें ठरविलें आहे.

साधू०— माझीही इच्छा दरबारला येण्याची आहे. आपली कांहीं हरकत नाहींना ?

खड्ग०— महाराज, आपणाला अडथळा कोण करणार आहे ?

साधू०— परंतु, ही जटा, ही दाढी व अंगास भस्म लावून तेथें येणें सभ्यतेच्या विरुद्ध होईल नाहीं बरें !

खड्ग०— असें कांहीं नाहीं.

साधू०— मी एक दिवसाकरितां हा वैराग्याचा वेष सोडून सरदारी थाट केला ह्मणून तरी बिघडलें कोठें ?

खड्ग०— कांहीं बिघडणार नाहीं. साधू व राजा एकच होत.

साधू०— माझ्या या वेषांतराबद्दल कोणी कांहीं बोलणार नाहीं; पण, नाहरसिंह मात्र गप्प बसणार नाहीं.

नाहर०— (हात जोडून) कां बरें ! !

साधू०— त्याचें कारण तुला ठाऊक नाहीं व मीही सांगू शकत नाहीं; पण मीं सरदारी थाट केल्याबरोबर तुला मात्र स्वस्थ बसवणार नाहीं, एवढेंच मी ह्मणतों.

नाहर०— आपण असें कां ह्मणतां, हें मला कळत नाहीं.

साधू०— (खड्गसिंहास) नाहरसिंह ह्मणतो कीं, मी कांहीं बोलणार नाहीं, याला आपण साक्षीदार असा.

खड्ग०—नाहरसिंह कां बोलेल, याचें कारण मलाही उमगत नाहीं.

साधू०— बरें तर हजामाला बोलवा, ह्मणजे आतांच सर्व कळून येईल. तुह्मी व नाहरसिंह माझ्याबरोबर एकांतांत चला व हजामालाही तेथेंच बोलवा.

नाहरसिंह, खड्गसिंह व साधुमहाराज दुसऱ्या तंबूंत गेले. हजामालाही तेथें आणलें. साधूमहाराजांनीं आपल्या जटा व दाढी काढविलीं व थोडथोडक्या मिशा ठेविल्या. नाहरसिंह व खड्गसिंह तो प्रकार पहात समोरच बसले होते. हजामत झाल्याबरोबर नाहरसिंह कावरा बावरा झाला. त्याच्यानें स्वस्थ बसवेना. तो एकदम साधुमहाराजांकडे ओढ घेऊं लागला; तेव्हां साधू ह्मणतातः—" हां, हां, पहा मीं प्रथमच सांगितलें होतें कीं, तुझ्यानें स्वस्थ बसवणार नाहीं."

नाहर०— खरोखरच मला स्वस्थ बसवत नाहीं. काय होईल तें होवो; मी आतां बोलणारच.

खड्ग०— नाहरसिंह, हा काय प्रकार आहे ?

नाहर०—नाहीं, नाहीं, मला बोलल्याशिवाय आतां राहवत नाहीं.

साधू०— मी प्रथमच समजून चुकलों होतों; पण थांब, या हजामाला जाऊं दे. आपण तिघेच राहिलों म्हणजे मग पाहिजे तर बोल.

हजाम गेल्यावर, दोन खिजमतगार बोलावले गेले. साधूमहाराजांनीं स्नान केलें व खड्गसिंहानें जे कपडे त्यांच्याकरितां आणले होते, ते त्यांनीं घातले. इतक्या दरम्यान नाहरसिंहाची जी स्थिति झाली, ती सांगतां येत नाहीं. मोठ्या मुष्किलीनें तो स्वस्थ बसला होता. अखेर साधुमहाराजांनीं पोषाक केल्यावर ते एकांतांत बसले व मग गोष्टी सांगूं लागले. या दुसऱ्या तंबूंत एक तासभर त्यांच्या गोष्टी चालल्या होत्या, पण त्या काय चालल्या होत्या कोण जाणें ! केव्हां केव्हां त्या तिघांच्या स्फुंदून स्फुंदून रडण्याचा आवाज मात्र ऐकूं येई; बाकी त्यांच्या गोष्टींबद्दल कांहींच समजलें नाहीं.

एक तासानंतर साधूमहाराज तोंडावर बुरखा घेऊन त्या तंबूंतून निघून गेले व नाहरसिंह आणि खड्गसिंह जेथें सर्व मंडळी होती, त्या तंबूंत पुन्हां आले. जमलेल्या मंडळींनीं विचारिलें:— "साधूमहाराज कोठें गेले व त्यांच्या त्या संदिग्ध भाषणाचा निकाल काय लागला ?" याजवर खड्गसिंहानें उत्तर दिलें कीं, "साधूमहाराज या वेळीं गेलेच, पण त्यांनीं उद्यां दरबारास येण्याचें कबूल केलें आहे व तेथेंच सर्व लोकांसमक्ष ते आपली सर्व हकीकत सांगणार आहेत." यापुढें तास दोन तासपर्यंत त्या सर्व मंडळींचें दुसरे दिवशींच्या दरबारसंबंधीं खलबत चाललें होतेंच; सुमारें मध्यरात्रीनंतर ती सर्व मंडळी आपल्या घरोघर गेली.

प्रकरण पंधरावें.

हरीपूरचा राजा करणसिंह याची बाग उत्तम प्रकारें शृंगारण्यांत आली होती. सूर्यप्रकाशाप्रमाणें दिव्यांचा चकचकाट झाला होता. बागेच्या प्रत्येक दरवाजावर उत्तम प्रकारची रोशनाई करण्यांत आली होती. बागेच्या मुख्य दरवाजापासून बंगल्यापर्यंत दुतर्फा चिरकदानें लाविलीं होतीं व ती मौज पहाण्यास हजारों लोकांचे थंब लोटले होते. या दरबारच्या बातमीनें सर्व शहर अगदीं हलून गेलें होतें. व सर्व शहरभर दरबाराबद्दल ठिकठिकाणीं चर्चा चालू होती. कोणी ह्मणत होते, नेपाळच्या महाराजांकडून राजास पदवी देण्याचा समारंभ आजच्या दरबारांत व्हावयाचा आहे; कोणी बोलत होते, हरीपूरच्या प्रजेचें प्रेम राजावर आहे कीं नाहीं, याचा फैसला आजच्या दरबारांत व्हावयाचा आहे; कोणाचें ह्मणणें पडलें, त्या सर्व गोष्टी असून वीरसिंहावरील आरोपाची चौकशीही व्हावयाची आहे; कोणी कल्पना करीत होते, या राजाला पदच्युत करून वीरसिंहाला गादीवर बसविणार आहेत व ही गोष्ट खरी असेल तर आपण प्राण जाईपर्यंत लढून वीरसिंहास गादीवर बसविण्याचा प्रयत्न करूं, असेंही कोणी बोलत होते. अशा प्रकारें नाना तऱ्हेची चर्चा शहरांत सकाळपासूनच चालू होती. वीरसिंहाच्या पक्षाचे लोक शहरांत पुष्कळ दिसले. बुद्धिमान् लोक मात्र याबद्दल बिलकूल चर्चा करीत नव्हते. गांवांतील मोठमोठ्या सर्व संभावित लोकांस आजच्या दरबारचें निमंत्रण होतें व बहुतेकांस दरबारांत काय होणार हें ठाऊकही होतें; पण, त्यांच्या तोंडांतून त्याबद्दल एक शब्दही निघत नव्हता.

बागेमध्यें एक सुंदर बंगला होता व तेथेंच दरबार करण्याचें ठरलें होतें. हा बंगला उत्तम रीतीनें शृंगारला होता. मध्यभागीं एक

सिंहासन ठेवण्यांत आलें होतें; व उजव्या बाजूस राजाकरितां आणि डाव्या बाजूस नेपाळचे सेनापति खड्गसिंह यांजकरितां दोन रुप्याच्या खुर्च्या ठेविल्या होत्या; व समोर दुतर्फा शिसवीच्या लांकडांच्या मखमालीनें मढविलेल्या खुर्च्या निमंत्रित लोकांकरितांहारीनें मांडल्या होत्या.

दिवेलागणीबरोबर लोक येऊं लागले व प्रहर रात्रीचे सुमारास तर दरबार थाटून भरला. राजा करणसिंह व सेनापति खड्गसिंह आपापल्या स्थानीं विराजमान झाले. नाहरसिंह, वीरसिंह व बाबूसाहेबही दरबारास आले होते व तोंडावर बुरखा घेऊन साधूमहाराजही एका खुर्चीवर बसले होते. साधूमहाराजांकडे पाहून लोक आश्चर्य करीत होते व राजाही हा गृहस्थ कोण असावा, या विचारांत पडला होता.

राजा अथवा राजाचे लोक नाहरसिंहास ओळखीत नव्हते; पण, वीरसिंहाच्या हातापायांत बिड्या नसून तो मोकळा असलेला पाहिल्याबरोबर राजा क्रोधानें लाल झाला; पण, ही बोलण्याची वेळ नाहीं, असें जाणून त्याला स्वस्थच बसावें लागलें. राजाचें दोन हजार सैन्य बागेच्या सभोंवतीं सज्ज होऊन बसलें होतें व राजाचे कारभारी दरबारांत न बसतां इकडे तिकडे हिंडत होते.

खड्गसिंहानें नेपाळांतून आपलेबरोबर आणलेले चारशें लढवय्ये शिपाई व नाहरसिंहाचे शंभर बहाद्दर लोक बागेच्या बाहेर तयार होते. बागेमध्यें दोन हजार लोकांचा समाज जमला होता; पैकीं ५०० राजाचे शिपाई होते व बाकी प्रजेपैकीं लोक होते.

दरबारचे सर्व लोक आल्याबरोबर खड्गसिंह उभा राहिला व सर्वांस ऐकूं जाईल, अशा स्वरानें म्हणाला:— “ नेपाळच्या महाराजांनीं ज्या कामाकरितां मला येथें पाठविलें, त्या कामाचा आज निकाल करण्याकरितां हा दरबार भरविला आहे. आजच्या दरबा-

रांत फक्त दोन मुख्य कामें करावयाचीं आहेत. एक, राजेसाहेबांचा दिवाण वीरसिंह यानें राजपुत्राचा खून केला, त्याचा निकाल करावयाचा व दुसरें राजा करणसिंह यांस "महाराज" ही पदवी द्यावयाची. वीरसिंहानें राजपुत्राचा खून केला असून त्याच्या हातांपायांत बिड्या कां नाहींत, ही एक शंका जमलेल्या मंडळीस येईल; परंतु, त्याचीं कारणें मी अशीं देतों कीं, एक तर तो राजाचा दिवाण या बड्या सन्माननीय हुद्यावर होता; दुसरें, या भरलेल्या दरबारांतून तो कोणत्याही प्रकारें पळून जाऊं शकणार नाहीं; तिसरें, राजाच्या लोकांनीं त्यास परवांचेच दिवशीं जखमी केल्यामुळें तो अगदीं हैराण आहे; व चवथें, वीरसिंह आपण राजपुत्राचा खून केला नाहीं, असें सिद्ध करून देण्यास तयार आहे. अशा चार कारणांमुळें मीं त्यास मोकळा ठेविला आहे. असो. मी वीरसिंहास आतां असा हुकूम देतों कीं, त्यानें आपल्यातर्फें कांहीं सांगावयाचें असल्यास सांगावें."

इतकें बोलून खड्गसिंह खालीं बसला व वीरसिंह भाषण करण्यास उभा राहिला. तो म्हणालाः— "सभ्यगृहस्थहो, आपणास ठाऊकच आहे कीं, ज्या मनुष्याला आपल्या जिवाची आशा उरली नाहीं, अथवा ज्यास फांशी देण्यास काढलें आहे, तो जें आपल्या मनांत येईल तें स्पष्ट बोलून टाकतो; कोणाला भीत नाहीं व कोणाची पर्वाही करीत नाहीं. आज माझी स्थिति तशीच झाली आहे. येथील करणसिंहराजेसाहेबांनीं मजवर राजपुत्राचा खून केल्याचा खोटा आरोप लादला आहे. आपल्या मुलास लपवून ठेऊन व प्रजेपैकीं एका गरीब मुलाचा खून करून मला फांशीवर चढविण्याचा त्यांचा बेत आहे. आपण मला या ठिकाणीं असा प्रश्न कराल कीं, राजाला असें करण्याचें कारण काय? आपला प्रश्न बरोबर आहे. त्या प्रश्नाचें उत्तर मी इतकेंच देतों कीं, राजा करणसिंहानें माझ्या बापाचा खून केला आहे. हा प्रथमतः माझ्या बापापाशीं नौकर

होता; व प्रसंग साधून यानें आपल्या धन्यास ठार मारून त्यानें राज्य बळकावलें. प्रथमतः राजाच्या मनांत माझ्याविषयीं द्वेष नव्हता पण नाहरसिंहानें राजाचा छळ करण्यास सुरवात केल्यापासून व माझ्यावर येथील प्रजा प्रेम करूं लागल्यापासून राजानें मला या जगांतून नाहींसें करण्याचा प्रयत्न सुरूं केला. नाहरसिंह विनाकारण राजाचा छळ करीत नाहीं. तो माझा थोरला भाऊ असून आपल्या बापाला ज्यानें मारलें, त्याचा सूड उगविण्याकरितांच तो राजाचा छळ करितो. (करणसिंह, करणसिंह दिवाणजी, नाहरसिंह, सुंदरी, तारा, व आपल्या स्वतःची मागें आलेली हकीकत सांगितल्यावर) आतां मजवर राजपुत्राचा खून करण्याबद्दल आलेला खोटा आरोप व माझ्या पित्याचा या राजानेंच खून केला या दोहोंबद्दल आपणाला पुरावा पाहिजे असेल, तर पहिल्या गोष्टीबद्दलचा पुरावा माझा थोरला भाऊ नाहरसिंह ज्याचें खरें नांव विजयसिंह आहे व जो या दरबांत या वेळीं हजर आहे तो देईल; व दुसऱ्या गोष्टीबद्दलचा पुरावा या दरबारांत हजर असलेला दुसरा एक मनुष्य देईल. "

हें भाषण संपल्याबरोबर दरबारांत जिकडे तिकडे दुःखोद्गार निघूं लागले. राजास तर 'दे माय धरणी ठाय' होऊन गेलें. माझी फजिती करण्याकरितां व माझ्यावर सर्व प्रजेदेखत माझे गुन्हे शाबीत करण्याकरितांच हा दरबार मुद्दाम करण्यांत आला, असें राजास वाटलें. आणलेल्या सिंहासनावर नाहरसिंहास किंवा वीरसिंहासच बसवावयाचें आहे; तें आपल्याकरितां नाहीं, अशी राजाची खात्री झाली. आपल्या दुष्कर्माबद्दल आपणास आज शिक्षा मिळणार, कोणत्याही रीतीनें आपला प्राण वाचण्याची आशा उरली नाहीं; तथापि, त्यांतल्या त्यांत आपण आपलें सैन्य आज जय्यत तयार ठेविलें आहे, ही गोष्ट फार चांगली झाली, एवढ्याबद्दल त्याला समा-

धान वाटल्यावांचून राहिलें नाहीं. प्राण वांचविण्याकरितां एकदां अखेरची लढाई खावयाचीच, असा त्यानें आपल्या मनाशीं निश्चय केला; तथापि, त्या दोन्ही गोष्टींचा पुरावा कसा होतो व नाहरसिंह कोणता? अशी जिज्ञासा उत्पन्न होऊन तो स्वस्थ बसला.

इतक्यांत नाहरसिंह ऊर्फ विजयसिंह उठून उभा राहिला व जवळ असलेलें रामदासाचें पत्र त्यानें खड्गसिंहाच्या हातीं दिलें व ह्मणालाः— "हा पहा एक प्रत्यक्ष पुरावा!"

खड्गसिंहानें तें पत्र घेऊन मोठ्यानें वाचून दाखविलें व हात उंच करून तो ह्मणालाः— "एका गोष्टीचा तर पुरावा उत्तम झाला असें मला वाटतें. या पत्रावर राजाची स्वदस्तुर सही व शिक्का आहे तेव्हां हें पत्र त्यास नाकबूल करितां येणार नाहीं." पत्र वाचल्या-बरोबर "राजाला ही गोष्ट मोठी लाजिरवाणी आहे" असे उद्गार चोहोंकडून निघाले.

खड्गसिंह पत्र वाचून खालीं बसल्याबरोबर साधूमहाराज उठले व आपल्या तोंडावरील बुरखा काढून सिंहासनाजवळ गेले आणि मोठ्यानें ह्मणालेः— "दुसऱ्या गोष्टीचा पुरावा मीच आहें. (सर्वां-कडे पाहून) मला पाहिल्याबरोबर 'मी कोण आहें' हें राजाला समजलेंच असेल; परंतु, आपणांला माझी ओळख पटणार नाहीं, ह्मणून सांगतों कीं, ज्याला या राजानें विष दिलें व ज्याची हकीकत वीरसिंहानें आतांच आपणांस सांगितली, तो वीरसिंहाचा बाप करण-सिंह मीच होय. माझा प्राण वाचविणाराचा मुलगा या शहरचा रहिवासी असून तो या दरबारांतही हजर आहे. माझी हकीकत विशेष रीतीनें सांगण्याची कांहीं आतां जरूर दिसत नाहीं. हां, पहा, तो निमकहराम राजा या वेळीं मजवर वार करण्यास तयार होत आहे. अद्यापिही त्याला आपल्या दुष्कृत्याबद्दल शरम वाटत नाहीं आणि तो........"

साधूमहाराजांचें (करणसिंहाचें) भाषण पुरें झालें नाहीं, तोंच राजा आपल्या म्यानांतून तरवार काढून, " मारा, तोडा, यांपैकीं एकही मनुष्य जिवंत ठेऊं नका " असें ह्मणत उठला; व साधूमहाराजांवर वार करण्यास धांवला; परंतु, सुदैवानें त्या वाराच्या तडाक्यांतून ते सुटले. राजाचे शिपाई व सरदार लोक आंत घुसले व प्रत्यक्ष लढाई सुरू झाली. दरबारांत रक्ताचा पाट वाहूं लागला; पण वीरसिंहाच्या पक्षाकडील लोकांपुढें त्यांना टिकाव धरवेना. राजाने दोन हजार लोक बाहेर जय्यत उभे होते; पण, ते मनापासून लढाई करीनात. एक तर राजाच्या जुलमानें ते लोक त्रस्त झाले होते, व दुसरें, आजच्या दरबारांतील हकीकत ऐकून तर त्यांचें मन राजाविषयीं अगदीं तिरस्कारयुक्त झालें होतें; मग मनापासून लढाई कोण करणार ? फक्त राजपक्षाचे जे कांहीं थोडे लोक होते ते मात्र एकनिष्टपणें लढले; पण, त्यांचें काय चालणार ? सुजनसिंह, शंभूदत्त, सरूपसिंह इत्यादि राजाचे मुख्य सल्लामसलतगार या लढाईंत मारले गेले व बाबूसाहेबांनीं तर खुद्द राजास गांठून त्याचे डोळे काढले. सारांश, अशा तऱ्हेनें कांहीं वेळ घनचक्कर उडाल्यावर सर्वांना स्वस्थ होण्याबद्दल इशारा करण्यांत आला. कांहीं वेळानें सर्व स्थिरस्थावर झाल्यावर खड्गसिंहानें वीरसिंहास सिंहासनावर बसविलें व तो ह्मणाला:— " ज्या वीरसिंहाला तुह्मी हरीपूरची प्रजा म्हणता, त्यास नेपाळच्या महाराजांचा प्रतिनिधी या नात्यानें मीं या राज्याच्या सिंहासनावर बसविलें आहे, तरी आजपासून सर्वांनीं याचा हुकूम ऐकावा व याच्यावर प्रेम करावें. " सर्व लोकांनीं त्यास मोठ्या आनंदानें टाळ्या वाजवून मान्यता दिल्यावर पानसुपारी अत्तरगुलाब देऊन दरबार बरखास्त करण्यांत आला.

प्रकरण सोळावें.

दुसरे दिवशीं लोकांना चांगल्या तऱ्हेनें महशूर झालें कीं, ज्या साधूस पाहून करणसिंह राजा बावरून गेला, तेच साधू वीरसिंहाचे वडील करणसिंह होत. त्यांच्याकडून लोकांना असें कळलें कीं, ज्यावेळीं दिवाणजींनीं सुजनसिंहाकडून करणसिंहास विष घातलें त्यावेळीं बरोबरच्या लोकांना त्यानें फितूर करून ठेविलें होतें. परंतु, त्यांत चार पांच लोक असे होते कीं, ते बाहेरून फितूर झाले होते; पण, त्यांचें अंतःकरण करणसिंहाकडेच होतें. ज्यावेळीं करणसिंह विषाच्या वेदनेनें बेशुद्ध झाला, त्यावेळीं तो मेला अशी आवई उठवून दिवाणजींनीं त्यास जिवंतच पुरून टाकून तावडतोब तेथून कुच केलें. दिवाणजींनीं कुच केल्यावर धनीसिंह नांवाचा एक रजपूत सरदार आपल्या नौकरांसहीत कांहीं बहाणा करून मागें राहिला व त्यानें करणसिंहास बाहेर काढून त्याचे प्राण वाचविले. विषाच्या जालीम प्रभावानें करणसिंह पुढें पांच वर्षेंपर्यंत अंथरुणास खिळून होता. हीं पांच वर्षें त्यानें दुसऱ्या एका शहरांत काढिलीं; व पुढें बैरागी बनून दिवाणजींचा सूड उगविण्याची संधी तो शोधूं लागला. कांहीं दिवसांनीं नाहरसिंहाची माहिती त्याला मिळाली व हरीपूरच्या जंगलांत त्यानें आपला तळ दिला. प्रसंग पाहून त्यानें नाहरसिंहाची गांठ घेतली; पण, आपलें खरें नांव मात्र त्यास सांगितलें नाहीं.

करणसिंहाचा जीव वाचविणारा धनीसिंह तर पुढें लवकरच मरून गेला; पण त्याचा धाकटा भाऊ अनिरुद्धसिंह (याचें नांव मागें आलेलें आहे) हा हरीपूर शहरांतच राहत असून त्याचा नांवलौकिक मोठा आहे व त्यास या गोष्टीसंबंधीं कांहीं माहितीही आहे. अनिरुद्धसिंह हा नेहमीं वीरसिंहाच्याच पक्षाला असे; परंतु, त्या वेळच्या मन्वंतराकडे पाहून त्यानें ही गोष्ट कोणाजवळही सांगितली नाहीं.

करणसिंहास आज आपले दोन्ही मुलगे, मुलगी, जांवई व नातू भेटले व धाकटा मुलगा तर राजपद पावलेला त्यानें पाहिला, ही फार आनंदाची गोष्ट होय. या ठिकाणीं वाचकवर्ग असा प्रश्न करतील कीं, करणसिंहाला गादीवर कां बसविलें नाहीं; व थोरल्या भावाला सोडून धाकट्या भावालाच गादीवर कां बसविलें ? याबद्दल इतकेंच सांगावयाचें आहे कीं, खड्गसिंहाच्या तंबूंत ज्यावेळीं करणसिंह, विजयसिंह व खड्गसिंह यांची एकांतांत मुलाखत झाली, त्यावेळीं करणसिंहानें गादीवर बसण्याचें नाकारिलें, आणि विजयसिंहानेंही स्पष्ट सांगितलें होतें कीं, माझें लग्न झालें नाहीं व लग्न करण्याचा माझा विचारही नाहीं; सबब, मी गादीवर बसणें उक्त नाहीं. सारांश, वीरसिंहासच गादीवर बसवावयाचें, हें पूर्वींच ठरून चुकलें होतें.

सरतेशेवटीं

राजपक्षापैकीं जे लोक वीरसिंहास शरण आले, त्यांना त्यांच्या खाण्यापिण्याचा बंदोबस्त करून दुसरे ठिकाणीं ठेवण्यांत आलें. राजवाड्याचा ताबा घेऊन सुंदरीची सुटका करण्यांत आली. ज्या राजवाड्याच्या तळघरांत सुंदरी आपल्या आयुष्याचे दिवस कंठीत होती व ज्या राजवाड्यांत जाणें ह्मणजे सर्पाच्या मस्तकावर पाय ठेवणें आहे असें तारेस वाटत होतें, तीच सुंदरी आज राजभगिनी ह्मणून व तीच तारा आज राजपत्नी ह्मणून राजवाड्यांत आनंदानें नांदू लागली. करणसिंह दिवाणजींचे लपवून ठेवलेले चिरंजीव सूरजसिंह यांचा पत्ता लागला नाहीं. रामदासानें आत्महत्या केली. डोळ्याच्या दुःखानें दिवाणजींनीं चारपांच दिवसांचे आंतच परलोकचा रस्ता धरला. वीरसिंहानें प्रजेचा संतोष कायम ठेऊन मोठ्या नेकीनें राज्यकारभार चालविला व क्षिप्रपत्नी तारेसह त्यानें आपला काळ सुखानें घालविला.

समाप्त.

कादंबरी कल्पद्रुम.

वरील नांवाचें डेमी अष्टपत्री सांचाचें अठ्ठेचाळीस पृष्ठांचें मासिक पुस्तक आह्मीं वांई येथें शके १८२२ च्या वर्षप्रतिपदेपासून सुरूं केलें आहे. यांत सुप्रसिद्ध बंगाली आणि हिंदी कादंबरीकार रायबहादूर **बंकिमचंद्र चतरजी**, लखनौ येथील कॉंग्रेसचे अध्यक्ष **आर्. सी. दत्त** आणि काशीनिवासी बाबू **देवकीनंदन खत्री** इत्यादिकांनीं लिहिलेल्या चटकदार कादंबऱ्या शुद्ध, सरळ आणि मनोहर अशा महाराष्ट्र भाषेंत अनुवादरूपानें देण्याचा क्रम सुरूं आहे. या मासिक पुस्तकाचे आजपर्यंत दहा अंक प्रसिद्ध झाले असून त्यांत **लावण्यमयी** नांवाची फारच बहारदार कादंबरी व रायबहादूर **बंकिमबाबू** यांची **कृष्णकांताचें मृत्युपत्र** नामक सर्वमान्य अर्थात् अत्यंत मनोवेधक अशी कादंबरी, आणि बाबू **देवकीनंदन** यांची **वीरेंद्रवीर अथवा कटोराभर रक्त** अशा तीन कादंबऱ्या संपूर्ण झाल्या आहेत. तसेंच **अकबर** नांवाची अप्रतिम ऐतिहासिक कादंबरी ही पुढील अंकीं समाप्त होईल. यापुढें फक्त पाहिल्याच अंकांत आलेली **कुसुमकुमारी** नामक कादंबरी पुढें चालू होऊन **बंकिमबाबूंच्या चंद्रशेखर** आणि **युगलांगुलीय** नामक सुंदर कादंबऱ्यांस सुरुवात करणार आहों. या मासिक पुस्तकाच्या द्वारें वर्षाचे काठीं वर वर्णन केलेल्या प्रकारच्या उत्कृष्ट कादंबऱ्यांचीं सहाशें पृष्ठें ग्राहकांस पोंचविण्याचें ठरविलें असून शिवाय, सुप्रसिद्ध बंगाली नाट्याचार्य बाबू **अमृतलाल बोस** यांच्या **तरुबाला** नामक नाटकाच्या भाषांतराचें निर्णयसागर छापखान्यांत साधेंच पण अंतर्बाह्य सुंदर काम केलेलें पुस्तक बक्षिस देत आहों. त्याशिवाय, **वीरेंद्रसिंह** नांवाची छोटेखानी कादंबरी दिवाळीची भेट ह्मणून ग्राहकांकडे पाठवीत आहों, ती वेगळीच. या मासिक पुस्तकांत प्रसिद्ध

शिवछत्रपतींचें चरित्र, दुर्गेशनंदिनी इत्यादि पुस्तकांचे कर्ते रा० **शिवराम गोविंद फाळके** यांनीं बंगाली कादंबऱ्यांची भाषांतरें देण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे. यावरून, हें मासिक पुस्तक पुढें किती सुंदर आणि चटकदार होत जाणार आहे, याची वाचकांस सहज कल्पना होईल. अस्तु. याची वार्षिक वर्गणी पोस्टेजसह फक्त २॥ रुपये असून ती अगाऊच घेतली जाते. या आमच्या प्रयत्नास रसिक महाराष्ट्रीयांनीं आपला उदार आश्रय द्यावा; अशी त्यांस सविनय विनंति आहे.